दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ शनिवार, दि.८ फेब्रुवारी २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १२८ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

बिबट्याचा १९ वर्षीय तरुण जखमी: जुन्नर तालुक्यातील रोहोकडी येथील घटना

नारायणगाव : दुचाकी वरून चाललेल्या तरुणाच्या दुचाकीवर झडप घेऊन पाठीमागे बसलेल्या युवकाला बिबट्याने जखमी केले . हि घटना जुन्नर तालुक्यातील रोहोकडी येथे गुरुवारी (दि.६) रात्री ८ वा. घडली. संदीप कुलवडे व साहिल डोंगरे हे ओतूर वरून रोहोकडी येथील महालक्ष्मीरोड ते गावठाण रस्त्यावरून मोटार दुरूस्तीसाठी जात असताना आढपांधी येथील शांताराम मुरादे यांच्या घराजवळ रस्त्याच्याकडेला असलेल्या ऊसात दबा धरून बसलेल्या बिबट्याने दुचाकीवर हल्ला केला . मागे बसलेल्या साहिल लक्ष्मण डोंगरे (वय १९) रा. उदापूर याला जखमी केले आहे . याचवेळी मागून आलेल्या दुचाकीवरील तरुणांनी व स्थानिकांनी आरडा ओरड केल्याने बिबट्याने पलायन केले . या घटनेची माहिती वनविभागाला मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी ओतूर लहू ठोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल रूपाली जगताप, वैभव वाजे, फुलचंद खंडागळे व टीमने घटनास्थळी येऊन डोंगरे यास तात्काळ ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रात आणून प्राथमिक उपचार केले आणि पुढील उपचारासाठी नारायणगाव येथे रवाना केले आहे . रोहोकडी येथे हल्ला आलायडर मशीन बसविण्यात आली आहे . रिस्को टीम या भागात गस्त घालणार असल्याचे वनविभागाने स्पष्ट केले.

मुख्यमंत्र्यांच्या पुढाकाराने विदर्भ विकासाला गती : केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी

नागपूर ■ दिलीप येवले

मोठ्या गुंतवणुकीमुळे विदर्भ उद्योगाच्या केंद्रस्थानी येणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

अॅडव्हान्टेज विदर्भ २०२५- खासदार औद्योगिक महोत्सवाचे थाटात उद्घाटन



नागपूर : गडचिरोलीपासून विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये उद्योगपूरक वातावरण निर्माण होत असून गुंतवणूक आकर्षित होत आहे. यामुळे नवनवे उद्योग येथे आकाराला येत आहेत व रोजगार निर्मितीही होत आहे. पर्यटन, उद्योग व दळण-वळण अशा अनेक क्षेत्रात विदर्भ पुढे जात असून मोठ्या गुंतवणुकीमुळे तसेच 'अॅडव्हान्टेज विदर्भ' या महोत्सवाच्या आयोजनामुळे येत्या काळात विदर्भ उद्योगक्षेत्राच्या केंद्रस्थानी येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने उद्योग, रोजगार निर्मिती आदींच्या माध्यमातून विदर्भाच्या विकासाला गती मिळाल्याचे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी सांगितले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसरात अ?डव्हांटेज विदर्भ २०२५- खासदार औद्योगिक महोत्सवाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले. यावेळी केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, महसूल तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, उद्योग मंत्री उदय सामंत, इतर बहुजन मागास कल्याण मंत्री अतुल सावे, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, कामगार मंत्री आकाश फुंडकर, उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक, वित्त व नियोजन राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल, गृह राज्यमंत्री (ग्रामीण) पंकज भोयर, खासदार श्यामकुमार बर्वे उपस्थित होते.

विदर्भासाठी ५ लाख कोटींच्या करारांचा समावेश

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुणे ही राज्यात निर्मिती क्षेत्राची राजधानी म्हणून आकाराला येत आहे. राज्यातील अन्य भागातही उद्योग वाढीस लागत आहेत. नुकत्याच दावोस येथे पार पडलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्रासाठी १५ लाख ७० हजार कोटींचे सामंजस्य करार झाले. राज्याच्या सर्वच भागात उद्योगवाढीसाठी गुंतवणूक आणण्यात आली आहे. यात विदर्भासाठी ५ लाख कोटींच्या करारांचा समावेश असून गडचिरोलीमध्ये जेएसडब्ल्यु उद्योगसमुहाने ३ लाख कोटींची गुंतवणूक करार केले आहेत. गडचिरोलीसह नागपूर, वर्धा, चंद्रपूर येथे बॅटरी निर्माण, सौरऊर्जा आदी प्रकल्प उभे राहणार आहेत. हे सर्व सामंजस्य करार प्रत्यक्षात येणार असल्याचा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

आशिया खंडातील सर्वात मोठे स्टिलहब

गडचिरोलीत गुंतवणूक होत असल्याने नक्षलप्रभावित जिल्हा म्हणून ओळख पुसून आशिया खंडातील सर्वात मोठे स्टीलहब येथे उभारले जाणार आहे. लगतच्या चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, यवतमाळ या जिल्ह्यांमध्येही गडचिरोलीतील गुंतवणुकीचा फायदा होणार आहे. गडचिरोलीत येत्या काळात विमानतळ उभारण्यात येणार आहे. अमरावती येथील टेक्सटाइल झोनमध्ये उद्योग सुरु झाले असून आता तिथे अतिरिक्त जागा उपलब्ध करून देणार आहोत.

वस्त्रोद्योग क्षेत्र अधिक सक्षम

पीएम मित्रा पार्कच्या माध्यमातून येथे वस्त्रोद्योग क्षेत्राला अधिक सक्षम करण्यात येईल. विदर्भात होणारे कपाशीचे उत्पादन व कपाशीचा आयुध निर्माण क्षेत्रात होणारा उपयोग लक्षात घेता या भागात उद्योग उभारण्यासंदर्भात पूरक वातावरण निर्माण करण्यात येईल. अमरावती येथे आशिया खंडातील सर्वात मोठे विमानचालक प्रशिक्षण केंद्र उभारुन यातून दरवर्षी २५ हजार विमानचालक प्रशिक्षित करण्याचे नियोजन असल्याचेही त्यांनी सांगितले. वर्धा जिल्ह्यात ड्रायपोर्ट निर्मितीसोबतच इलेक्ट्रॉनिक बस हब निर्माण करण्यात येईल, येत्या ४ वर्षात चंद्रपूर येथे कोल गॅसिफीकेशन व्यवस्था निर्माण करण्यात येईल. नाशिकहून थेट वाढवण बंदरावर माल पोचविण्याचे नियोजन सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

विदर्भातून काकिनाडापर्यंत दळण-वळणाची संपर्क व्यवस्था आंध्रप्रदेश व तेलंगण राज्यांच्या सहकार्याने करण्याचे नियोजन सुरू आहे. दुबई विमानतळ हबच्या धर्तीवर नवी मुंबई विमानतळ हब करण्याचे प्रयत्न सुरू असून त्यास समांतर व्यवस्था नागपूर विमानतळावर निर्माण करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

नक्षलवाद, गरिबी, बेरोजगारी दूर करण्याच्या दिशेने कामाला सुरूवात

केंद्रीय परिवहन मंत्री श्री. गडकरी म्हणाले, राज्याच्या एकूण खनिज संपत्तीच्या ७५ टक्के खनिज विदर्भात आहे. एकूण वनक्षेत्राच्या ८० टक्के वन विदर्भात आहे. ही जमेची बाब असून येथे पर्यटन व उद्योग क्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने गती मिळाली आहे. गडचिरोली जिल्ह्याचे मागासलेपण दूर व्हावे यासाठी दशकांपासून कार्य सुरू आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी पुढाकार घेत या जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वीकारले. येथे उद्योगांच्या माध्यमातून गुंतवणूक ओढून आणत येथील नक्षलवाद, गरिबी, बेरोजगारी दूर करण्याच्या दिशेने कामाला सुरूवात झाली आहे. ?डव्हांटेज विदर्भच्या आयोजनातून विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये उद्योग वाढीसाठी पुरक वातावरण निर्माण करण्याचे उद्दीष्ट असून येत्या ४ वर्षात यास गती देण्याचे नियोजन असल्याचेही त्यांनी सांगितले.

उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले, दावोसमध्ये राज्यातील समतोल औद्योगिक विकासासाठी सामंजस्य करार करण्यात आले. राज्य शासन उद्योगपूरक सोयी-सुविधा व वातावरण निर्माण करीत आहे. परिणामी राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत आहे. यास अधिक गती देवून भविष्यात हा आलेख वाढविण्यात येईल. देशाच्या अर्थव्यवस्थेला जगात तिसऱ्या स्थानी घेवून जाण्याच्या उद्दीष्टपूर्तीसाठी महाराष्ट्र महत्वाचे योगदान देईल यासाठी अॅडव्हान्टेज विदर्भ सारखे आयोजन महत्वाची भूमिका पार पाडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यभर असे आयोजन व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

जे.एस.डब्ल्यू उद्योग समुहाचे व्यवस्थापकीय संचालक सज्जन जिंदल म्हणाले, गडचिरोलीसह विदर्भात ३ लाख कोटींची गुंतवणूक होत आहे. याचा फायदा स्थानिकांना होवून विदर्भ जगाच्या नकाशावर ठळकपणे दिसेल. एचसीएल कंपनीच्या प्रमुख रोषणी मल्होत्रा म्हणाल्या, नागपूरातील मिहानमध्ये २०१८ पासून एचसीएल कार्यरत असून ५ हजार ५०० बेरोजगारांना रोजगार देण्यात आला आहे. यात ४० टक्के महिलांचा समावेश आहे. लॉईड मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बालकृष्णन प्रभाकरन यांनी गडचिरोली जिल्ह्यात दोन वर्षात १० हजार रोजगार निर्माण करणार असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक अॅडव्हांटेज विदर्भ महोत्सवाचे संयोजक तथा असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांनी केले.

या औद्योगिक प्रदर्शनात विविध उत्पादने आणि बहु-क्षेत्रीय उद्योगांचे ३२० हून अधिक दालन उभारण्यात आली आहेत. यात सार्वजनिक उपक्रम, स्टील आणि खाण मंत्रालय, भारतीय विमानतळ प्राधिकरण, सेबी, केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ, जीएसटी विभाग, पोस्ट विभाग, इत्यादिंचे दालनही आहेत. येत्या ९ फेब्रुवारी पर्यंत सकाळी १०.३० ते रात्री ८.३० वाजेपर्यंत हा महोत्सव सर्वांसाठी खुला असणार आहे.

महाराष्ट्रात सोयाबीनची सर्वाधिक खरेदी : पणन मंत्री जयकुमार रावल



वृत्तसंस्था ■ **मुंबई**

मुंबई : महाराष्ट्रात इतर सर्व राज्यांपेक्षा सर्वात जास्त प्रमाणात सोयाबीनची हमी भावाने खरेदी करण्यात आली असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली आहे. दि. ०६ फेब्रुवारी २०२५ अखेर ५ लाख ११ हजार ६५७ शेतकऱ्यांकडून ११ लाख २१ हजार ३८५ मे.टन सोयाबीनची खरेदी करण्यात आली असल्याची माहिती श्री. रावल यांनी दिली.

खरेदी केलेला सोयाबीन महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या ३४५ गोदामात तसेच भाडेतत्वावरील २५२ खासगी गोदामात साठवणूक करण्यात आला आहे. मात्र या हंगामात सोयाबीन खरेदी मोठ्या प्रमाणात झाली असल्याने सदर गोदामांची साठवणूक क्षमता देखील पूर्ण झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र शासनाने सन २०२४-२५ करिता सोयाबीनसाठी प्रति क्विंटल ४८९२ रुपये इतका हमीभाव घोषित केला असून तो मागील वर्षाच्या हमीभावापेक्षा २९२ रुपये प्रति क्विंटल इतका जास्त आहे. नाफेड व एनसीसीएफ या केंद्रीय नोडल एजन्सीअंतर्गत सहा राज्यस्तरीय नोडल एजन्सीमार्फत शेतकरी नोंदणी व खरेदी प्रक्रिया राबविण्यात आली असून त्यासाठी नाफेडद्वारे ४०३ व एनसीसीएफद्वारे १५९ अशी एकूण ५६२ केंद्रावर खरेदी सुरू करण्यात आली.

सोयाबीन खरेदीसाठी दि. १ ऑक्टोबर २०२४ पासून ऑनलाईन शेतकरी नोंदणी सुरू करण्यात येऊन दि.१५ ऑक्टोबर २०२४ पासून प्रत्यक्ष खरेदी सुरू झाली. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ९० दिवसांची मुदत दि. १२ जानेवारी २०२५ पर्यंत होती. मात्र शेतकरी नोंदणीचे प्रमाण विचारात घेऊन खरेदी प्रक्रियेस केंद्र शासनाच्या मान्यतेने प्रथम दि. ३१ जानेवारी २०२५ पर्यंत आणि नंतर दि. ०६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत दुसरी मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती पणन विभागामार्फत देण्यात आली.

बंदोबस्ताला तैनात पोलिसावर दगडाने हल्ला, पोलीस गंभीर जखमी

वृत्तसंस्था ■ **मुंबई**



मुंबई : गावदेवी येथे बंदोबस्ताला तैनात पोलीसावर ३६ वर्षीय व्यक्तीने दगडाने हल्ला केल्याचा प्रकार गुरूवारी घडला. या हल्ल्यात पोलीस शिपाई शिवाजी उगले गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी गावदेवी पोलिसांनी हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. पण त्याची मानसिक स्थिती ठीक नसल्याचे सूत्रांनी सांगितले.

तक्रारादार पोलीस शिपाई शिवाजी उगले गुरूवारी गावदेवी परिसरात बंदोबस्तासाठी तैनात होते. त्यावेळी मागून अनोळखी व्यक्ती आली. त्याच्याकडील गोणीमध्ये दगड भरले होते. आरोपीने गोणीमधील दगड उगले यांना मारण्यास सुरूवात केली. कबुतर खान्याजवळील सेल्फी पॉईन्ट येथे हा प्रकार घडला. त्यात उगले यांच्या डोक्याला, पायाला व कंबरेला गंभीर दुखापत झाली. त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले.

रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. उगले यांच्यासोबत तैनात इतर पोलिसांनी आरोपी रणजीत सिंह सरताणी याला ताब्यात घेतले. याप्रकरणी उगले यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला. त्यानंतर रणजीत सिंहला याप्रकरणी अटक करण्यात आली. आरोपी मुळचा गुजरात येथील असून त्याची मानसिक स्थिती ठिक नसल्याचे आढळले. उगले यांची प्रकृती ठीक असून आरोपी त्यांच्या परिचयाचा नसल्याचे त्यांनी सांगितले. याप्रकरणी गावदेवी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

सर्व रुग्णालयातील औषधांची नवीन नियमावलीप्रमाणे गुणवत्ता तपासणी : सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

वृत्तसंस्था ■ **मुंबई**

मुंबई, दि.७: राज्यातील सर्व आरोग्य संस्था मधील औषधाचा उपलब्ध साठा व गुणवत्ता याची नवीन नियमावलीप्रमाणे तपासणी करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर यांनी दिले.आरोग्यमंत्री श्री. आबिटकर यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे झालेल्या बैठकीत हे निर्देश दिले आहेत. जिल्हास्तरापासून राज्य स्तरापर्यंत सर्वत्र तातडीने ही मोहीम हाती घेण्यात येणा? आहे.

औषधांचा पुरेसा साठा ठेवावा

राज्यातील सर्व रुग्णालयांनी आवश्यक औषधांचा पुरेसा साठा ठेवावा. औषध गुणवत्ता तपासणी मोहीम नवीन नियमावलीनुसार करावी. सर्व आरोग्य संस्थांनी खरेदी केल्यानुसार औषधाच्या नोंदी ई-औषधी प्रणालीमध?ये २४ ते ४८ तासांच?या आत घ्याव्यात, औषध साठ्याच्या समूह क्रमांकनिहाय नोंदी बिनचूक असाव्यात. खरेदी केलेल्या सर्व औषधींचे ूम निहाय नमुने ैश्च प्रयोगशाळेत तपासणी करावी. कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी पुरवठादार कंपनी व प्रयोगशाळा यांचा संपर्क होणार नाही (अदंत ँत्वह्गह्व) अशी व्यवस्था करावी. प्रत्येक औषधाचा प्रत्येक समूह क्रमांक तपासणी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, याकरिता त्रयस्थ ैश्च प्रयोगशाळा, अथवा खरेदी प्राधिकरणामार्फत निर्धारित झालेल्या मानांकित प्रयोगशाळे मार्फत तपासणी करावी. औषध साठा प्राप्त झाल्यापासून तपासणी अहवाल विहित कालावधीत प्राप?त होईपर्यंत औषधसाठा स्वतंत्र ठेवण्यात यावा. अहवालानुसार प्रमाणित केलेल्या औषधांचा वापर करण?यास यावा. तसेच औषधे अप्रमाणित आढळून आल?याचा अहवाल प्रयोगशाळेने दिल?यास त?या औषधाचा तात?काळ वापर थांबवण्यात यावा या नियमावलीचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश आरोग्य मंत्र्यांनी दिले आहेत.

महाराष्ट्र राज्य वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाने आरोग्य विभागांतर्गत जिल?हास?तरावरील औषध भांडाराकडून एकूण ८६ औषधी नमूने ैश्च प्रयोगशाळांना पाठवले होते. त्यापैकी ३२ नमुन्यांच्या अहवाल वापरण्यास योग्य असून ५४ नमुन्यांचा अहवाल प्रलंबित आहे. तसेच वैद्यकीय शिक्षण औषध भांडाराकडून मागविण्यात आलेले ६९ औषधी नमूने ैश्च प्रयोगशाळांना पाठविण्यात आले होते. त्यापैकी १४ नमुने वापरण्यास योग्य आहेत. तसेच ५५ नमुन्यांचा अहवाल प्रलंबित असल्याची माहिती प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

राज्यात सर्व जिल्ह्यात मिळून सन २०२३-२४ मध्ये १२ हजार ७६७ प्रकारच्या औषधांची खरेदी करण्यात आली होती. त्यापैकी १ हजार ८८४ नमुने प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविण्यात आले असून त्यापैकी १ हजार ७७२ नमुने वापरण्यास योग्य असून ०३ नमुने वापरण्यास अयोग्य आहेत. अद्याप १०९ नमुन्याचा अहवाल अप्राप्त आहे. तसेच सन २०२४-२५ मध्ये ९ हजार ६०० प्रकारच्या औषधांची खरेदी करण्यात आली. त्यातील ४ हजार ६९१ नमुन्यांपैकी ३ हजार १७९ नमुने वापरण्यास योग्य असून ५ नमुने वापरण्यास अयोग्य आहेत. तसेच १ हजार ५०७ नमुन्यांचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे. अहवालानुसार वापरण्यास अयोग्य असलेल्या ूम्पे सर्व संबंधितांना कळविण्यात आले असून त्यांचा वापर थांबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अशी माहिती उपस्थित अधिकाऱ्यानी यावेळी दिली.

राज्यातील आरोग्य संस्थात पुरवठा होत असलेली औषधे प्रयोगशाळेत काटेकोर तपासून घ्यावीत. तसेच रुग्णाची गैरसोय होणार नाही यासाठी आवश्यक औषधांचा पुरेसा साठा ठेवण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

सामाजिक दायित्व ही कॉर्पोरेटसह प्रत्येक नागरिकाची जबाबदारी : राज्यपाल सी पी राधाकृष्णन

वृत्तसंस्था ■ **मुंबई**



मुंबई : सामाजिक दायित्व ही केवळ कॉर्पोरेटसची जबाबदारी नसून सामाजिक दायित्व प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. सर्वसमावेशक व संवेदनशील समाज निर्मितीसाठी प्रत्येकाने समाजासाठी आपले योगदान दिले पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

इन्स्टिट्यूट ऑफ डायरेक्टर्स (छ्ध्ड) या संस्थेतर्फे कॉर्पोरेट सामाजिक दायित्व या विषयावर आयोजित १९ व्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत हॉटेल ताज लँड्स एंड, मुंबई येथे झाले.

माजी सरन्यायाधीश व छ्ध्ड-चे सहअध्यक्ष न्या. उदय लळीत, चार्ल्स ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक जोस चार्ल्स मार्टिन, इन्स्टिट्यूट ऑफ डायरेक्टर्सचे अध्यक्ष ले.जन. सुरिंदर नाथ, 'सेबी'चे माजी अध्यक्ष अजय त्यागी, छ्ध्ड-च्या पश्चिम क्षेत्राचे अध्यक्ष व राज्याचे माजी मुख्य सचिव सीताराम कुंटे तसेच छ्ध्ड्चे महासंचालक अशोक कपूर यावेळी उपस्थित होते.

विविध संस्थांनी आपला सामाजिक दायित्व निधी वेगवेगळ्या क्षेत्रात खर्च केला तर त्याची फलनिष्पत्ती प्रभावी होणार नाही, असे सांगून कॉर्पोरेट्स संस्थांनी सामाजिक दायित्व निधी निवडक क्षेत्रांमध्ये खर्च केल्यास ते अधिक परिणामकारक ठरेल असे राज्यपालांनी सांगितले.

टाटा व बिर्ला यांनी अतिशय प्रतिकूल काळात सामाजिक दायित्व निधीतून समाजासाठी व्यापक कार्य करताना समाजसेवेचा वस्तूपाठ ठेवला व त्यामुळे त्यांच्या नावासोबत विश्वास जोडला गेला, असे राज्यपालांनी सांगितले.

कॉर्पोरेट सामाजिक दायित्वामध्ये शहर दत्तक घेऊन त्याला इंदोरप्रमाणे देशातील सर्वात स्वच्छ शहर बनवता येईल. या दृष्टीने विचार झाला पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

कॉर्पोरेट सामाजिक दायित्व सन २०१३ कायद्याने अनिवार्य केल्यापासून आजवर देशभरात किमान हजारो कोटी रुपयांचा निधी समाजकार्यांवर खर्च झाला असून त्यातून शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, दिव्यांग कल्याण यांसह मानव विकास निर्देशांक सुधरण्यामध्ये उल्लेखनीय कार्य झाले असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

विकसित भारताचे लक्ष्य गाठण्यासाठी राज्यातील मागास आदिवासी विभागांचा विकास होणे आवश्यक असल्याचे सांगून आपण 'आदर्श आदिवासी गाव' विकसित करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे राज्यपालांनी सांगितले. त्याशिवाय राज्यात एक आदिवासी विद्यापीठ निर्माण करून त्या ठिकाणी उत्कृष्ट अभियांत्रिकी, वैद्यकीय व व्यवस्थापन संस्था निर्माण करण्याचा मानस असल्याचे सांगताना या उपक्रमांना सहकार्य करावे असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले. प्रत्येक व्यक्तीने महिन्यातून किमान एक दिवस किंवा वर्षातून काही दिवस सामाजिक कार्यासाठी द्यावे असे आवाहनही राज्यपालांनी यावेळी केले.

समाजातील अनेक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी विद्यापीठांनी संशोधक निर्माण करावे अशी सूचना माजी सरन्यायाधीश उदय ललित यांनी यावेळी केली. वायू प्रदूषण, प्लास्टिक कचरा, नदी प्रदूषण या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी संशोधकांनी पुढाकार घ्यावा असे न्यायमूर्ती लळीत यांनी सांगितले.

आयओडीचे पश्चिम क्षेत्राचे अध्यक्ष सीताराम कुंटे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

संपादकीय...

किती काळ...

...कारण राज्य सरकारप्रमाणे मुंबई महापालिकेसमोरही लोकानुनयाचे गंभीर आव्हान उभे ठाकले आहे.मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे २०२५-२६चा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. सोबत अतिरिक्त महापालिका आयुक्त विपिन शर्मा व अमित सैनीआशियातीलएकेकाळच्या सर्वात धनाढ्य वर्गेरे मुंबई महानगरपालिकेवर शासनाच्या मदतीवर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे मुंबईत सध्या सर्वत्र सुरू असलेल्या इमारतींच्या बांधकामांमुळे पालिकेला आर्थिक फायदा झाला. बांधकामांसाठी विकासकांना पालिकेला भराव्या लागणाऱ्या रकमेमुळे चालू आर्थिक वर्षात विकास नियोजन विभागाकडून ५८०० कोटी रुपयांचा महसूल अपेक्षित धरण्यात आला असता प्रत्यक्षात ८८०० कोटी मिळण्याची शक्यता वर्तविण्यातआली आहे. पुढील वर्षी हा कर १० हजार कोटींच्या आसपास जाऊ शकतो, असा अंदाज आहे. तरीही पालिकेचा गाडा हाकण्यासाठी मुदत ठेवींना हात घालावा लागेल, असे सूतोवाच आयुक्तांनी केले आहे. मुदत ठेवींचा असा वापर करणे म्हणजे देशातील सर्वात श्रीमंत मुंबई महानगरपालिकेचा भव्य आणि मजबूत आर्थिक पाया डगमगू लागला असल्याचे लक्षण मानले जात असेल तर ते चुकीचे नाही.महापालिकेकडे ८० हजार कोटी रुपयांपेक्षाही अधिक रकमेच्या मुदत ठेवी आहेत. पालिकेने हाती घेतलेले विविध प्रकल्प मार्गी लावण्यासाठी मुदत ठेवींचा वापर करण्याची आवश्यकता आयुक्तांनी सूचित केली. अशी वेळ येणे धोकादायक. हे म्हणजे घर चालवण्यासाठी पूर्वजांनी पुढच्या पिढीसाठी ठेवलेले दागदागिने मोडून खाण्यासारखे. वास्तविक मुदत ठेवी व त्यातून मिळणारे व्याज ही मुंबई महानगरपालिकेची मोठी जमेची बाजू मानली जाते. पण 'पैसे बँकेत ठेवण्यापेक्षा शहराच्या विकासासाठी खर्च करावे', असा उफराटा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच दोन वर्षांपूर्वी आपल्या मुंबई दौऱ्यात मुंबई महानगरपालिकेला दिला. तेव्हा खरे तर तो पालिका प्रशासनास मोठा धक्का होता. आता पंतप्रधानच पैसे बँकेत ठेवण्यापेक्षा खर्च करा, असा सल्ला देऊ लागल्यास मागचा-पुढचा कसलाही विचार न करता योजनांची घोषणा करणाऱ्या सत्ताधीशांसमोर अधिकाऱ्यांचाही नाइलाज होतो. तरीही गगराणी यांनी जास्त ठेवी मोडण्याचे टाळले हे दिलासाजनक. भविष्यात या ठेवीच पालिकेच्या उपयोगी पडू शकतात. पण हा दिलासा किती टिकाऊ असेल हे सांगता येणे अवघड. त्यामुळे महसुली उत्पन्न वाढविण्यासाठी मुंबई महानगरपालिकेला नवनवीन उपाय योजावे लागतील. याचाच भाग म्हणून आयुक्तांनी मुंबईतील सुमारे ५० हजार झोपड्यांमधील दुकाने, गॅरेजेस, लहान-मोठे उद्योग असा व्यावसायिक वापर करणाऱ्यांकडून कर वसूल करण्याची योजना मांडली. ते योग्यच.याशिवाय घनकचरा व्यवस्थापन वापरकर्ता शुल्क वसूल करण्याचेही प्रस्तावित करण्यात आले. तथापि एका बाजूला आर्थिक आघाडीवर कठोर उपाय योजावे लागणार असले तरी दुसऱ्या बाजूने मुंबईकरांच्या वाहतुकीच्या दृष्टीने 'बेस्ट' प्रशासनाला एक हजार कोटी रुपयांची मदत पालिकेला करावी लागणार आहे. एस. टी. किंवा बेस्ट या एकेकाळी आर्थिक स्वयंपूर्ण असलेल्या सेवा आता परावलंबी झाल्या आहेत. हे चित्र बदलण्याची शक्यता नाही. महाराष्ट्रातीलच नव्हे देशातील अन्य महानगरपालिकांचा विचार करता मुंबई महानगरपालिकेचा कारभार एका निश्चित चौकटीत चालतो. भूगोलाच्या मर्यादांमुळे अवघडलेल्या मुंबई शहराचा आकार-उकार लक्षात घेता, मुंबई महानगरपालिकेकडून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सोयीसुविधा खरोखरच वाखाणण्याजोग्या आहेत. पालिकेकडून उभारण्यात आलेला किनारी मार्ग(कोस्टल रोड)हा पूर्णपणे नवीन रस्ता हे मुंबई महानगरपालिकेचे मोठे यश मानावे लागेल. गोरगरिबांना मोफत उपचार मिळावेत यासाठी महापालिकेकडून चालवली जाणारी इस्पितळे हीदेखील अभिमान बाळगावी अशी बाब. असे प्रचंड क्षमता असलेले हे शहर त्याचे हात-पाय बांधून ठेवलेले असल्याने पळू शकत नाही ही बाब क्लेशकारक. राजकीय पक्षांनी मुंबईला बटीक म्हणूनच वागवले. दिल्लीकरांचा प्रयत्न मुंबईची मालकी त्यांच्याकडे कशी खेचता येईल हा आणि मुंबईकरांचा ते प्रयत्न कसे हाणून पाडता येतील हा. या साठमारीत हे शहर दुर्लक्षितच राहते. वास्तविक न्यू यॉर्क, लंडन वा तत्सम शहरांशी बरोबरी करण्याची क्षमता असलेले हे शहर प्रशासकीय दौर्बल्य आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव यामुळे आपली अपेक्षित उंची गाठू शकत नाही, हे वास्तव आहे. मुंबईकरांचे हे प्रात्तन किती काळ असेच राहणार हा प्रश्नच आहे.

ओबीसी स्वतंत्र गणना: का बरं आढेवेढे?

(भारतीय जनगणना आरंभ दिन विशेष)



लोकांची मोजणी करण्याची प्रथा शासनव्यवस्थेच्या स्थापने इतकीच जुनी आहे. ईजिप्शियन, ग्रीक, रोमन, हिब्रू, पर्शियन, या लोकांनी लोकसंख्येची मोजणी वेळोवेळी केल्याचे इतिहासात नमूद आहे. चीन-जपानमध्येही पुरातन काळापासून अशी मोजणी होत असे. साधारणतः अशी मोजणी सैन्यभरतीस योग्य वय असलेल्या नागरिकांची किंवा करपात्र लोकांची संख्या समजण्यासाठी जरूर तेव्हा होत असे. सबंध शहराची लोकसंख्या मोजण्यास यूरोपमध्ये पंधराव्या व सोळाव्या शतकांत सुरुवात झाली. मद्रास शहराची अशी लोकसंख्या मोजणी सन १६८७मध्ये झाल्याचे नमूद आहे. त्यानंतर राष्ट्रीय स्वरूपाची जनगणना सुरू झाली. सरकारला ओबीसी प्रवर्गातील लोकांची वेगळ्या रकान्यातून जनगणना करावीच लागेल. का व कशी? यावर जोर देणारा लेख श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी यांच्या रोखठोक शब्दांतून... संपादक.

स्वीडनमधील पहिली जनगणना सन १७५०मध्ये झाली. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात १७९० पासून व ग्रेट ब्रिटनमध्ये १८०१ पासून दर दहा वर्षांनी जनगणना घेण्यात येतात. भारतात पहिली जनगणना दि.९ फेब्रुवारी १८७२ रोजी सुरू करून ती काही महिन्यांती पार पडली व त्यानंतर सन १८८१पासून दर दहा वर्षांनी जनगणना घेण्यात आल्या. काही राष्ट्रे जनगणना दर पाच वर्षांनी घेतात, तर काही त्यांना जरूर वाटेल तेव्हा जनगणना करतात. हे काम बरेच खर्चाचे असल्यामुळे बहुतेक राष्ट्रांत दर दहा वर्षांनी जनगणना करण्याची प्रथा आहे. सुरुवातीस जनगणनेच्या वेळी प्रत्येक कुटुंबाविषयीची माहिती गोळा करीत, परंतु नंतर प्रत्येक व्यक्तीबद्दल माहिती गोळा करण्यात येऊ लागली. पुढे पुढे गरीब, दुर्बल, मागास समाज घटकांची माहिती घेतली जाऊ लागली. आता इतर मागासवर्ग-ओबीसींची माहिती गोळा करणे क्रमप्राप्त व अत्यावश्यक नाही का? अशी व्यक्तिगत स्वरूपाची राष्ट्रीय जनगणना सर्व प्रथम बेल्जियममध्ये सन १८४६मध्ये व अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात सन १८५०मध्ये घेण्यात आली. हळूहळू सर्वच राष्ट्रांनी अशा प्रकारची जनगणना घेण्यास सुरुवात केली. सन १९६०च्या सुमारास सबंध जगात एकूण १८०हून अधिक जनगणना घेण्यात आल्या आहेत. त्यात लोककल्याणाच्या उदयोन्मुख समस्या व प्रश्नांना प्राधान्याने घेऊन त्यासाठी विकासात्मक धोरण अवलंबिले आहेत. हे काय खोटे आहे?

स्वातंत्र्यपूर्व काळात आठ व स्वातंत्र्योत्तर काळात तीन वेळा जनगणना या भारतात झाल्या. वेळोवेळी जनगणना अधिनियम संमत करण्यात येऊन त्यांनुसार जनगणना घेतली जाते. त्यासाठी आयुक्त, संचालक, पर्यवेक्षक वगैरे अधिकारी नेमण्यात येतात. त्यांना इतर अधिकाऱ्यांची मदत होते. प्रत्यक्ष गणनेचे काम प्रगणकांकडे सोपविण्यात येते. शिक्षक, पोलीस, जिल्हा परिषदांचे व नगरपालिकांचे कर्मचारी या सर्वांची मदत गणनेसाठी घ्यावी लागते. त्यांची निवड झाल्यावर जनगणना कशी घ्यावी? निरनिराळ्या याद्या व अनुसूच्या कशा वापराव्यात? प्रश्नांवलीतील प्रश्नांची उत्तरे कशी लिहून घ्यावीत? आदी बाबींचे त्यांना प्रशिक्षण द्यावे लागते. त्यांच्याकडून नमुन्यादाखल काही माहितीही गोळा करून घ्यावी लागते. सन १९७१मध्ये झालेल्या जनगणनेच्या वेळी प्रगणकाला चार प्रकारच्या याद्या तयार कराव्या लागल्या होत्या. आज इतर मागासवर्ग आपली जनसंख्या जाणून घेण्याच्या मनस्थितीत आहे, तेव्हा त्यांचीही माहिती वेगळ्या रकान्यातून करणे प्रशासनाला अत्यंत निकडीचे आहे, आढेवेढे घेऊन ते टाळणे महागात पडू शकते. कारण व्यक्तिगत पट्टीद्वारा गोळा केलेली सर्व माहिती गोपनीय मानली जाते. देशाच्या काही भागांत स्थानिक वा राजकीय अडचणींमुळे गणनेच्या कालखंडात आवश्यक ते फेरफार करावे लागतात. जनगणनेत गोळा झालेल्या माहितीचे जिल्हागणिक आणि राज्यागणिक संकलन करून तात्पुरत्या स्वरूपाचे आकडे जनगणनेचे काम संपल्यापासून पाच दिवसांच्या आतच मध्यवर्ती जनगणना कार्यालयाकडे उपलब्ध होऊ शकतात. यावरूनच या अवाढव्य प्रशासकीय प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या संघटनात्मक प्रयत्नांची व भारतीय जनतेने दिलेल्या उत्स्फूर्त सहकार्याची काहीशी कल्पना येऊ शकते. याकामी जनतेचे सहकार्य फार मोलाचे ठरते. आता जर का भारत सरकारने इतर मागास वर्ग-



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

ओबीसी समाजघटकातील लोकांच्या इच्छेविरुद्ध जनगणना सुरू केली तर त्यांचे सहकार्य मिळणे शक्यच नाही. हा संपूर्ण घटक- समूह पुढील प्रत्येक जनगणनेवर बहिष्कार टाकण्याच्या पावित्र्यात खंबीर उभा ठाकला आहे. त्यामुळे देशाच्या विकास कार्यास खिळ बसणे साहजिकच आहे.

जनगणना म्हणजे एखाद्या राष्ट्राच्या हद्दीत राहणाऱ्या लोकांची मोजणी होय. आधुनिक काळात प्रत्येक राष्ट्रातील शासनाचे हे एक अटळ कर्तव्य झाले आहे. राष्ट्राची लोकसंख्या किती? त्यातील लोकांची सामाजिक व आर्थिक वैशिष्ट्ये कोणती? त्यांचे राष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत वितरण कसे झाले आहे? सामाजिक व जीवशास्त्रीय फेरफारांचे त्यांच्यावर कसकसे परिणाम होतात? आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक किती? सामाजिक घटक कोणते? त्या त्या सामाजिक घटकांतील लोकसंख्या किती? आदी अनेक प्रश्न दैनंदिन प्रशासनासाठी महत्त्वाचे ठरतात. त्यांना यशस्वीरित्या हाताळण्यासाठी आवश्यक असलेली माहिती जनगणनेद्वारा उपलब्ध होते. शासनाला केवळ जनगणनाच नव्हे, तर प्रसंगोपात इतर अनेक प्रकारच्या गणना करण्याची आवश्यक भासत असते. उदा. कृषिगणना, पशुधनगणना, उत्पादनगणना, घरांची मोजणी, जनगणना इत्यादी. मग ओबीसी जनगणना का बरे होऊ नये? अशा सर्व गणनांतून उपलब्ध होणारी आकडेवारी राष्ट्रीय प्रगती दर्शविते व राष्ट्राच्या अनेक समस्यांचा उलगडा करण्यास उपयोगी पडते. विशेष करून जनगणनेद्वारे मिळणाऱ्या माहितीतून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप व राष्ट्राचे मानवी भांडवलरूपी सामर्थ्य यांवर यथोचित प्रकाश टाकला जाऊ शकतो. जनगणना म्हणजे विशिष्ट काळी एखाद्या राष्ट्रातील किंवा प्रदेशातील सर्व लोकांबद्दलची जनांकिकीय, आर्थिक व सामाजिक आकडेवारी गोळा करणे आणि तिचे योग्य संकलन करून तिला प्रसिद्धी देण्याची संपूर्ण प्रक्रिया होय. जनगणनेच्या सहा वैशिष्ट्यांवर संयुक्त राष्ट्रांनी भर दिला आहे- जनगणनेला राष्ट्राचा पुरस्कार पाहिजे, तिचे क्षेत्र व घटक निश्चित असले पाहिजे, त्या क्षेत्रातील सर्व व्यक्तींचा त्यात समावेश झाला पाहिजे, ती गोळा केलेली माहिती विशिष्ट कालक्षणाबद्दल असली पाहिजे, प्रत्येक व्यक्तीविषयी अलग-अलग माहिती नमूद केली पाहिजे, गोळा केलेली माहिती प्रसिद्ध झाली पाहिजे. जनगणना करताना संबंधित राष्ट्रे त्यांना त्या वेळी महत्त्वाच्या वाटणाऱ्या बाबींविषयी माहिती गोळा करतात. कालमान व परिस्थिती यानुसार निरनिराळ्या जनगणनांतील बाबी वेगवेगळ्या असू शकतात. जनगणनेत खालील बाबींचा समावेश हवा,असे संयुक्त राष्ट्रांनी सुचविले आहे- जनगणनेच्या वेळी व्यक्तीची स्थाननिश्चिती व नेहमीचे राहण्याचे ठिकाण, कुटुंबप्रमुखाशी नाते, लिंग, वय, वैवाहिक स्थिती, जन्मस्थळ, नागरिकत्व, आर्थिक व्यवसाय, उद्योग, हुद्दा, भाषा, वंशत्व व राष्ट्रीयत्व, साक्षरता, शैक्षणिक पातळी, शालेय हजेरी व प्रत्येक स्त्रीला किती अपत्ये झाली त्यांची संख्या नोंद करावी. ज्या राष्ट्रांना या सर्व बाबींचा जनगणनेत समावेश करता येणे शक्य नसेल, त्यांनी किमानपक्षी लिंग, वय, वैवाहिक स्थिती व आर्थिक व्यवसाय याबाबींची माहिती तरी गोळा केलीच पाहिजे. मागील सन २०११च्या शिरगणतीनंतर म्हणजेच दहा वर्षांनंतर सन २०२१मध्ये होणे क्रमप्राप्त असताना सरकारने जनगणना करण्याकडे जाणूनबुजूनच कानाडोळा केला. आज जनगणनेविना तब्बल ३ वर्षे उलटून गेली. ओबीसींच्या स्वतंत्र जनगणनेला सरकार टरकले की काय? एक न उलगडणारे कोडेच आहे तर....

जनगणना दोन प्रकारांनी करता येते. एकतर प्रत्येक कुटुंबप्रमुखाकडून छापील प्रश्नावली भरून घ्यावयाची किंवा गणना करणाऱ्यांनी कुटुंबप्रमुखांना समक्ष भेटून माहिती घ्यावयाची आहे. काही देशांत जनगणनेपूर्वी सर्व घरांची यादी व मोजणी करतात व तिच्या आधारे जनगणनेच्या वेळी कोणीही वगळले जाऊ नये, अशी काळजी घेतात. गोळा केलेल्या माहीतीचे त्वरित संकलन व सारणीकरण व्हावे, अशी व्यवस्था करावी लागते. त्यानंतरच सारणीरूपाने निरनिराळ्या बाबींविषयींची वर्गीकृत माहिती प्रसिद्ध करता येते. जनगणना अपूर्ण राहू नये, तिच्यात चुका होऊ नयेत यांसाठी प्रश्नावली तयार करण्यापासून ते थेट अखेरच्या आकडेवारीचे संकलन प्रसिद्ध करेपर्यंत प्रत्येक टप्प्याला शक्य तेवढी काळजी घ्यावी लागते. जनतेचे पुरेपूर सहकार्य आणि कार्यक्षम प्रशासन यंत्रणा यांशिवाय जनगणनेची कार्यक्षमता व गुणवत्ता पूर्णपणे समाधानकारक असूच शकत नाही. जनगणना अनेक कारणांसाठी घेतली जाते. सामाजिक व आर्थिक विकासाचे प्रयत्न करण्यासाठी ती आवश्यकच ठरते. आरोग्य, साक्षरता, शिक्षण, उत्पन्न, राहणीमान, अन्नपुरवठा, कृषिउत्पादन, औद्योगिक उत्पादन आदी क्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्याच्या योजना आखण्यासाठी बऱ्यांच विविध माहितींची आवश्यकता असते. मतदान पद्धतीने लोकप्रतिनिधी निवडणे व कल्याणकारी राज्यातील सुविधांचे योग्य वाटप करणे, यांसाठीही जनगणेतील माहिती उपयोगी पडते. उद्योगपती व व्यापारी संख्या जनगणनेच्या आधारे आपापल्या व्यवसायांचे योग्य नियोजन करू शकतात. शिवाय आर्थिक, सामाजिक व जनांकिकीय प्रश्नांवर संशोधन करणाऱ्यांना जनगणनेमधून उपलब्ध होणारी माहिती अनेक दृष्टींनी उपयुक्त असते. म्हणूनच जनगणनेला संशोधनाचे आणि प्रशासनाचे एक बहुउद्देशीय साधन मानतात. सन १९६१पूर्वी जनगणनेसाठी लागणारी संघटना प्रत्यक्ष गणनावर्षापूर्वी एकदोन वर्षे अगोदरपासून अस्तित्वात येई व जनगणनेची कार्यवाही संपल्यानंतर दोनतीन वर्षांतच विलयास जाई. त्यामुळे जनगणनेच्या प्रश्नांकडे सातत्याने लक्ष पुरविणाऱ्या संघटनेचा भारतात अभाव होता. ही उणीव सन १९६१नंतर भरून काढण्यात आली. केंद्र, प्रत्येक राज्य व केंद्रशासित प्रदेश यांत आता जनगणना कार्यालये सातत्याने कार्यप्रवण असतात. त्यांना आगामी जनगणनेची पूर्वतयारी करण्यास पुरेसा अवधी मिळतो. जनगणनेच्या वेळी राज्यांसाठी नेमण्यात येणाऱ्या पर्यवेक्षकांना आता जनगणना संचालक म्हणतात. सन १९७१च्या जनगणनेसाठी जनगणना आयुक्त आणि महानिबंधक या अधिकाऱ्यांची नेमणूक सन १९६८मध्ये व बहुतेक राज्य संचालकांच्या नेमणुका सन १९६९मध्येच करण्यात आल्या होत्या. मग इतर मागासवर्ग- ओबीसींची स्वतंत्र रकान्यात नोंद करून घेण्यास अडचणी येतीलच कशा?

!! भारतीय जनगणना आरंभ दिनाच्या सप्ताहभर सर्व सूज्ञ भारतीय बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

प्रयाण...

आजकाल वाढतेयं
आत्महत्येचे प्रमाण
स्वेच्छेने मृत्यूमागत
करे जगातून प्रयाण

अशा विचित्र घटना
ऐकायं येई श्रूयमाण
जीवना का कंटाळी
स्व कोषात रममाण

प्रत्येक प्रश्नांस नसे
उत्तर मृत्यू परिमाण
जाणून घ्यापरिणाम
येई समस्या सुयाण

सुटूनि जाल आपण
गूढ स्थळास निर्याण
पहायला नसे कुणी
नंतरचे चित्र भयाण

विधात्यानेअद्वितीय
विश्व हे केले निर्माण
ठरविले जनन मरण
कधी होणार निर्वाण

शंका कुशंका उठती
भ्रमाचा वाढे सुयाण
का केली आत्महत्या
मनातपेटले चिल्हाण

जिवंतआप्तांचे मरण
आयुष्य होईल वैराण
पोलीसांचा ससेमिरा
सर्वत्र मातेलं अयराण

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६.

आयटीत...

नव्वद तास
कामात
आय टी मधली पोरे
काबाडकष्ट करतात
जणू जुंपली गुरे ढोरे

एटीएम मशीन झाले
चित्त अधिकचं हावरे
मॅरेथॉन रेस नोकरीत
भिंगरी बांधून धाव रे

उच्चशिक्षित गुलामहे
लिलावा घ्या बेभाव रे
एम्प्लॉईनंबर प्रत्येका
विसरून जाई नाव रे

आरोग्य पणाला लावे
करिअर आपलेसावरे
टार्गेट परिपूर्ण वेळेवर
केवळ त्यानाचं वाव रे

दे आमीष उच्चपोष्टचे
कंपनी कुटील डाव रे
खुणाविते पैसा ऐसा
गलेलठ्ठ पॅकेज हाव रे

हातात देतीलं नोटीस
कर्मचारी कावरेबावरे
विकूनटाकले तारुण्य
भितीच्याछायेत वावरे

आत्महत्ये प्रवृत्त करी
केवढा अघोरी घाव रे
दिसते ऐटीतले वागणे
अदृश्य काठीने सावरे

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

अंत्यविधीवरून येणाऱ्या तरुणाचा हिट ॲण्ड रन अपघातात मृत्यू

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : नातेवाईकाच्या अंत्यविधीवरून परतत असताना मोटरगाडीने दिलेल्या धडकेत ३६ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. गंभीर बाब म्हणजे मृत तरुणाच्या दुचाकीला धडक दिल्यानंतर मोटरचालक तेथून पळून गेला. या अपघातात मृत तरुणाचा पुतण्याही जखमी झाला.गोरेगाव (पूर्व) येथे रमेश झोरे (३६) आणि त्यांचा पुतण्या नरेश (१८) गुरुवारी पहाटे कांदिवलीहून दुचाकीवरून घरी परतत होते. त्यांची दुचाकी पश्चिम द्रुतगती महामार्गावरील दिंडोशी उड्डाणपुलावर पोहोचली.

तेव्हा एका भरधाव वेगात आलेल्या चारचाकी वाहनाने त्यांच्या स्कूटरला मागून जोरदार धडक दिली. त्यामुळे दोघेही रस्त्यावर पडले. धडक देणारी मोटरगाडी घटनास्थळावर थांबली नाही. अपघातानंतर नरेश बेशुद्ध पडला. काही वेळाने त्याला शुद्ध आल्यानंतर त्याच्या आजूबाजूला पोलीस दिसले. त्याला तातडीने ट्रॉमा केअर रुग्णालयात नेण्यात आले, असे पोलिसांनी सांगितले. रुग्णालयात पोहोचल्यानंतर नरेशने आपल्या काकांबद्दल विचारणा केली, झोरे गंभीर जखमी झाले होते आणि डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले, अशी माहिती पोलिसांनी दिली. नरेशने संपूर्ण घटना पोलिसांना सांगितली, त्यानंतर दिंडोशी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्यान्वये निष्काळजीपणामुळे मृत्यू आणि जखमींना वैद्यकीय मदत न पुरवणे तसेच पोलिसांना माहिती न देण्याच्या आरोपाखाली गुन्हा नोंदवला आहे.

पोलीस घटनास्थळावरील सीसी टीव्ही कॅमेऱ्यातील चित्रणाची तपासणी करीत आहेत. अपघात घडवणाऱ्या वाहनाचा व त्याच्या चालकाचा शोध घेत आहेत. दोघेही एका नातेवाईकाच्या अंत्यविधीसाठी गेले होते. तेथून परतत असताना हा अपघात झाला. या अपघातात नरेशलाही मार लागला असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दोन पिस्तुल आणि १० लाख रुपयांच्या रोख रकमेसह सराईत आरोपीला अटक

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : दोन पिस्तुल, जिवत काडतुसे आणि दहा लाख रुपये रोख रकमेसह सराईत आरोपीला अटक करण्यात मेघवाडी पोलिसांना यश आले. आरोपी शस्त्राची विक्री करण्यासाठी आला होता. त्यावेळी त्याला अटक करण्यात आली. यापूर्वी आरोपीने कोणाला शस्त्रांची विक्री केली का याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

सहाय्यक पोलीस निरीक्षक सम्राट वाघ व पोलीस शिपाई दत्तात्रेय बागुल यांना सराईत आरोपी जोगेश्वरी पूर्व येथे शस्त्रांची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे जोगेश्वरी पूर्व येथील पश्चिम द्रुतगती मार्गाजवळील रामगड परिसरात पोलिसांना सापळा रचला होता.ेताआरोपी गौस मोहिद्दीन शहाबुद्दीन सय्यद येथील पाण्याच्या टाकीजवळ येऊन उभा राहिला होता. त्याची ओळख पटल्यानंतर पोलिसांनी त्याला घेराव घातला. आरोपी पळण्याचा प्रयत्न करू लागला. त्यावेळी त्याला ताब्यात घेण्यात आले. झडती घेतली असता त्याच्या जवळ १० लाख रुपये रोख रक्कम, देशी बनावटीच्या दोन पिस्तुल, सहा जिवंत काडतुसे असा एकूण ११ लाख रुपयांचा मुद्देमाल सापडला. आरोपीविरोधात भारतीय शस्त्रास्त्र कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. आरोपी सराईत गुन्हेगार असून यापूर्वीही मेघवाडी पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीकडून देशी बनावटीच्या दोन पिस्तुल हस्तगत करण्यात आल्या असून त्यांची विक्री करण्यासाठी आरोपी जोगेश्वरी येथे आला होता. यापूर्वीही आरोपीने अशाच प्रकारे शस्त्रांची विक्री केल्याचा संशय आहे. त्या शस्त्रांच्या विक्रीचे १० लाख रुपये आरोपीकडे मिळाल्याचा संशय आहे. त्यामुळे आरोपीने यापूर्वी कोणाला शस्त्रांची विक्री केली, याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

केजच्या आठवाडी बाजारात मोबाईल चोरांचा सुळसुळाट ; बसस्थानकातील पोलीस चौकी नावालाच काय?-नागरिकांचा सवाल

केज ■ तात्या गवळी



केज:केज येथील आठवाडी बाजारात मोबाईल चोरांचा सुळसुळाट चालू असून अनेकांचे मोबाईल चोरीला गेले परंतु चोरीला गेलेले मोबाईल अद्यापही परत मिळाले नाहीत अशा नागरिकांतून चर्चा ऐकण्यास मिळत आहेत तर

केज बसस्थानकातील पोलीस चौकी नावालाच आहे काय?असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज येथे मंगळवार व शुक्रवार रोजी आठवड्यातून दोन वेळा आठवडे बाजार भरत आहे.

या बाजारामध्ये गर्दीचा गैरफायदा घेत बाजारात येणाऱ्या नागरिकांचे मोबाईल चोरीला जाण्याचे प्रमाण दिवसाने दिवस वाढु लागले आहे तर केज बस स्थानकामध्ये देखील अनेक महिला प्रवाशांचे दागिने, पर्स चोरीला जाण्याचे प्रमाण वाढत चालले आहे असे जनसामान्यातून बोलले जात आहे.

अनेक जणांचे मोबाईल सह चोरीला गेलेल्या वस्तू अद्यापही मिळून आल्या नाहीत अशा चर्चा सध्या ऐकण्यास मिळत आहेत असाच प्रकार मंगळवार रोजी मंगळवारच्या बाजारामधून आठ मोबाईल चोरीला गेले आहेत असे बोलले जात आहे. त्यापैकी वसंत रंगनाथ सोनवणे रा. येवता ता. केज यांचा ओपो कंपनीचा मोबाईल चोरीला गेला असून त्या मोबाईलची किंमत २२ हजार ९९९ रुपये एवढी आहे. वसंत सोनवणे यांनी त्यांचा ओपो कंपनीचा मोबाईल चोरीला गेल्याची तक्रार मंगळवार रोजी केज पोलीस ठाण्यात दिली आहे. सदर प्रकरणी पुढील तपास केज पोलीस हे करत आहेत.

मंगळवारच्या बाजारातून चोरीला गेलेल्या मोबाईल पैकी काही नागरिक केज पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले असता त्यांच्याकडे मोबाईल विकत घेतल्याची पावती नसल्यामुळे त्यांना तक्रार देता आली नाही असे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

केज हे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे येथून मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, तुळजापूर, सोलापूर, बार्शी, कुर्डूवाडी, पंढरपूर, कोल्हापूर, आंबेजोगाई, परळी, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, औसा, निलंगा यासह अनेक ठिकाणी जाण्यासाठी केज येथून एसटी बस उपलब्ध असल्यामुळे बसस्थानकात प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते या गर्दीचा गैरफायदा घेत अनेक महिलांचे दागिने व प्रवाशांचे मोबाईल चोरीला गेलेले आहेत.

या बसस्थानकामध्ये एक पोलीस चौकी आहे परंतु या ठिकाणी पोलीस कर्मचारी नसतात सतत सदर पोलीस चौकी ही बंद असल्यामुळे या ठिकाणी चोरीचे प्रमाण वाढत चालले आहे असे प्रवाशातून बोलले जात आहे. सदर पोलीस चौकी सतत चालू राहिली तर केज बस स्थानकातील चोरीचे प्रमाण कमी होऊ शकते त्यामुळे लवकरात लवकर सदर पोलीस चौकी चालू करण्यात यावी अशी मागणी प्रवासी वर्गातून केली जात आहे. मंगळवारच्या बाजारातून चोरीला गेलेले मोबाईल सापडतील का? असे जनसामान्यातून बोलले जात आहे व ते पाहणे हे उत्सुकतेचे ठरेल.

श्री संत ज्ञानेश्वर गुरुकुल येथे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न

केज ■ तात्या गवळी



केज:श्री संत ज्ञानेश्वर गुरुकुल येथे मोठ्या उत्साहात स्नेहसंमेलन झाले संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य तथा ह.भ.प.ईश्वरजी मुंडे सर, या कार्यक्रमाचे उद्घाटक सुरेश तात्या पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रा.हनुमंत भोसले सर, कानडी माळी चे सरपंच अशोक राऊत, साबल्याच्या सरपंच जनाबाई काकडे,सरपंच विष्णू थोरात, माजी सरपंच दिनकर चाटे, होळचे ग्रामपंचायत सदस्य हनुमंत घुगे, माजी. सभापती नारायण बप्पा घुले, सुदाम पालकर सर, माजी चेअरमन श्रीकांत घुले, अशोक चाळक, ज्येष्ठ पत्रकार धनंजय कुलकर्णी, अशोक नागरगोजे, वसंत सोनवणे, तात्या गवळी, मुबाशीर खतीब यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रसह विविध क्षेत्रातील मान्यवर व पत्रकार बांधव बांधव तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना ईश्वरजी मुंडे यांनी गुरुकुल याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले. पुढे बोलताना मुंडे म्हणाले की, श्रीराम प्रभू,लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न यांनाही गुरुकुल मध्ये शिक्षण घेण्यासाठी त्याकाळी पाठवले होते तसेच आताच्या आधुनिक काळात गुरुकुल विषयी शाळेतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना व्यसनापासून मुक्त व्हावे व व्यसनाच्या आहारी जाऊ नये याचे शिक्षण दिले पाहिजे व मोबाईलचा अतिवापर टाळला पाहिजे शाळेची शिक्षकाची व पालकाचे जबाबदारी आहे असे मत प्राचार्य ईश्वर मुंडे सर व्यक्त केले आहे. यावेळी विद्यार्थी व उपस्थित पालकांना भोसले सर यांनी मोलाचा सल्ला दिला आहे. यावेळी साबल्याच्या सरपंच जनाबाई काकडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या. तर सुरेश तात्या पाटील यांनीही श्री संत ज्ञानेश्वर गुरुकुलचे संस्थापक सचिव दादासाहेब कराड यांना या संस्थेचे रूपांतर वटवृक्षात व्हावे अशा शुभेच्छा दिल्या व सदैव आम्ही आपल्या सोबत आहोत अशा शुभेच्छा देऊन लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी थोडक्यात मनोगत व्यक्त करून मान्यवरांनी छोट्या चिमुकल्या मुलांचे कौतुक पाहण्यासाठी मान्यवरांनी बक्षीस रूपात त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम केले. यावेळी संत ज्ञानेश्वर गुरुकुल संस्थेचे सर्व कर्मचारी वृंद विद्यार्थी पालक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो:सुनील केंद्रे

जिल्हा प प्रा शाळा आनेगाव येथे सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

केज ■ तात्या गवळी



केज : केज तालुक्यातील आनेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध गीतांचे वैविध्यपूर्ण प्रदर्शन करून प्रेक्षकांची मने जिंकली.

विद्यार्थ्यासोबतच पालकांनीही सहभागी होऊन विविध गुणदर्शनांना वाव दिला. यामध्ये पालकांनी विविध नाटके सादर केली. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. लक्ष्मण लाखे, प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री. सुनील केंद्रे होळ,केजचे केंद्रप्रमुख श्री. चौरे युसुफ वडगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.बोराडे, डॉ हनुमंत सौदागर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रमुख पाहुणे विस्तार अधिकारी केंद्रे म्हणाले स्नेहसंमेलन कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो यामधून त्यांचा सर्वांगीण विकास होतो असे मत त्यांनी व्यक्त केले.

शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य यांची तसेच समस्त गावकऱ्यांची उपस्थिती होती. पालकांनी सादर केलेल्या नाटकातून प्रथम क्रमांक- जैसी करनी वैसी भरणी द्वितीय क्रमांक- अकरा रुपये ठेवा अंगात आला देवा तृतीय क्रमांक - काळ्या आईची व्यथा या नाटकाना मिळाले. पालकांनी सादर केलेल्या नाटकाचे परीक्षण श्री. लाखे श्री. मुळे श्री. गुजर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या माजी विद्यार्थिनी कु ज्ञानेश्वरी गवळी व श्रद्धा हंडीबाग यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. पौळ श्री. मांगडे व श्रीम. पूनम हंडीबाग यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास गावातील महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेतील सहभागामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक विकास घडून येतो- हनुमंत घाडगे

स्वामी विवेकानंद माध्यमिक विभाग शाळेमध्ये गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ सोहळा संपन्न



केज ■ तात्या गवळी

केज:जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर मा. वि. या शाळेमध्ये दि. ६ फेब्रुवारी २०२५ रोजी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील शालेय अंतर्गत तसेच विविध स्पर्धेमधील घवघवीत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ सोहळा अत्यंत हर्षोत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळाचे सचिव गिन्यानदेव गदळे, प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त शिक्षक हनुमंतराव घाडगे, इतर उपस्थितीमध्ये पोस्टमन म्हणून कार्यरत असणारे अंकुश चाटे, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे आदी उपस्थित होते.


कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या शालेय अंतर्गत वैयक्तिक तसेच सांघिक स्पर्धेतील विजयी खेळाडूंचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. पुढे एकलव्य सामान्य ज्ञान स्पर्धा, दहावी स्वयंशासन दिनानिमित्त उत्कृष्ट अध्यापन करणारे विद्यार्थी, चित्रकला स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी, योगासन तसेच लेझीम पथकातील विद्यार्थी, तुळजापूर येथील मराठवाडास्तरीय वक्तृत्व स्पर्धा व सामान्य ज्ञान स्पर्धेतील विजेते विद्यार्थी या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध पारितोषिके व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

वरील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना शाळेतील क्रीडाशिक्षक श्रीकिशन नेहरकर, कलाशिक्षक दादासाहेब गायकवाड, वक्तृत्व स्पर्धेसाठी दत्ता सत्वधर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच इतर स्पर्धात्मक परीक्षेसाठी शाळेतील सर्व शिक्षक विशेष परिश्रम घेतात.

याप्रसंगी बोलताना हनुमंत घाडगे म्हणाले, विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेमध्ये सहभागी झाले पाहिजे, कारण बक्षीसांपेक्षा स्पर्धेतील सहभाग महत्त्वाचा असतो. शालेय अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास होतो, परंतु स्पर्धेतील सहभागामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक विकास होतो. करिता पालकांनी देखील आपल्या मुलांना विविध स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन तसेच आभार प्रबोधकांत समुद्रे यांनी मानले.

केज-बीड रोडवरील सारणी- सांगवी जवळ भीषण अपघात;मुलीच्या लग्नाचा बस्ता बांधण्यासाठी निघालेल्या वडिलांसह अन्य एका महिलेचा मृत्यू

केज ■ तात्या गवळी



केज: केज तालुक्यातील कासारी येथील कुटुंब लग्नासाठी बस्ता बांधण्यासाठी नगरला जात असताना केजपासून जवळच सांगवी (सारणी) पाटी येथे भीषण अपघात झाला. या अपघातात मुलीच्या वडिलांसह एका महिलेचा मृत्यू झाला, तर इतर नातेवाईक जखमी झाले. हा हृदयद्रावक प्रकार आज (शुक्रवार, ७ फेब्रुवारी) सकाळी ८ वाजता घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, केज तालुक्यातील कासारी येथील रामेश्वर शाहूराव डोईफोडे यांची मुलीचे लग्न २३ फेब्रुवारीला होणार होते. त्यासाठी ते मुलीसह नातेवाईकांना घेऊन बस्ता बांधण्यासाठी अहिल्यानगरला निघाले होते. मात्र, सांगवी पाटीजवळील पुलावर पुढे वळण घेत असताना त्यांची जीप आणि टेम्पोची जोरदार धडक झाली. या अपघातात शिक्षक श्रीराम घुले यांच्या पत्नी उर्मिला घुले यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातस्थळी उपस्थित नागरिकांनी रामेश्वर डोईफोडे, लक्ष्मण डोईफोडे आणि इतर जखमींना तातडीने अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयात हलवले. मात्र, उपचार सुरू असताना रामेश्वर डोईफोडे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

लग्न अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले असताना वडिलांच्या आणि नातेवाईकाच्या मृत्यूमुळे संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावातही या दुर्दैवी घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळांना ईमारत बांधकाम, शाळा दुरुस्ती, वीजपुरवठा, स्वच्छतागृहे या पायाभूत सुविधांसाठी निधी द्या ; ना.पंकजाताई मुंडे यांना निवेदन- डॉ.गणेश ढवळे

बीड ■ गितांजली लव्हाळे



बीड: बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरावस्था झाली असुन या शाळांमध्ये शिक्षणाच्या पायाभूत सुविधांसाठी निधी देण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी आज दि.७ शुक्रवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठकीच्या निमित्ताने आलेल्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा संपर्क मंत्री बीड जिल्हा ना.पंकजाताई मुंडे यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या आहेत त्यांची पुनर्बाधणी आवश्यक आहे तर ४६८ शाळांमधील ८५६ वरवगखोल्यांची दुरुस्ती आवश्यक आहे. तसेच जिल्हा परिषदेच्या ६३ वस्तिशाळांना स्वतःची इमारत नसल्याने किरायाच्या रूममध्ये, पत्र्याच्या शेडमध्ये, झाडाखाली भरविण्यात येत आहेत त्यांना इमारतीसाठी निधी देण्यात यावा. बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या १३९२ शाळांमध्ये वीजपुरवठा खंडित असल्याने शालेय विद्यार्थ्यांचे कॉम्प्युटर, स्मार्ट टीव्ही ,डिजिटल बोर्ड,एलईडी, आदि उपकरणे धुळखात पडुन असुन एकंदरीतच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्यच अंधारात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे डिजिटल शैक्षणिक नुकसान होत असून वीज देयके व इतर कारणांसाठी निधीची तरतूद करण्यात यावी. तसेच बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २१६४ शाळांपैकी ३१७ शाळांमध्ये स्वच्छतागृहांचा अभाव असुन विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक कुचंबणा होत असुन त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

आनंदराज आंबेडकर यांचा भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन भव्य सत्कार

माजलगाव ■ दर्शन डोंगरे



माजलगाव : माजलगाव येथे निर्भिड पत्रकार संघाच्या वतीन वितरीत होणा-या मुखनायक पुरस्कार वितरण कार्यक्रमासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातु , बौद्ध जनसमितीचे सभापती तथा रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आद.आनंदराज आंबेडकर साहेब उपस्तीत झाले आसता त्यांनी सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प यथे भेट दिली त्या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन त्यांच भव्य स्वागत करुन सत्कार करण्यात आला त्या प्रसंगी उपस्तीत भारतीय बौद्ध महासभेचे ता अध्यक्ष डॉ भागवत साळवे,महिला जिल्हा अध्यक्ष कमलताई डोंगरे,सरचिटणी शोभाताई भोजने,जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,बी सी डोंगरे,गुलाब प्रधान,विजयदादा साळवे, अंकुश आण्णा जाधव,डि एस साळवे, सिद्धार्थ वक्ते, दयानंद साळवे, नितीन डोंगरे,भगवान डोंगरे, गुलाब धाईजे,हरिबाई टाकणखार,लिलाताई उजगरे,वंदना घनघाव ,मंदाताई साळवे, शारदाताई तांगडे,अनुराधा साळवे,आशाताई मोरे,विशाखा वाघमारे,शांताबाई साळवे,मंडोधरी खंदारे,मोहन काकडे,बळीराम काकडे,राजेभाऊ साळवे,भानदास साळवे,अभिमन्यू साळवे, तात्यासाहेब साळवे, बाबासाहेब घनघाव, एन डी गायकवाड,एल आर मस्के,सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व धम्म उपासक उपासिका मोठ्या संखेने उपस्तीत होते

उम्मेहानी मुक्तार शेख यांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर जागतिक महिला दिनी होणार मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मान

बीड ■ गितांजली लव्हाळे



बीड : वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षापासून अबॅकस शिकवण्यामध्ये तरबेज झालेल्या उम्मेहानी मुक्तार शेख यांच्या बुद्धी कौशल्याची चुणूक लक्षात घेऊन त्यांना पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक महिला दिनी देण्यात येणाऱ्या जागतिक स्तरावरील स्त्री रत्न पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

बीड येथील बालपिर नगर रोड येथील रहिवासी असलेल्या उम्मेहानी मुख्तार शेख यांनी वयाच्या तेराव्या वर्षापासून म्हणजे सन २०१८ पासून विद्यार्थ्यांना अबॅकसचे शिक्षण देण्यास सुरुवात केली. तेव्हा त्या अवघ्या आठवी वर्गामध्ये शिकत होत्या. अबॅकस हा फक्त व्यवसाय म्हणून नाही तर समाजसेवा म्हणून त्यांनी हे काम हाती घेतले. इतर महिलांना देखील प्रशिक्षण देऊन त्यांनी आपल्या स्वतःचे अबॅकस क्लासेस सुरू करण्याची संधी इतर मुलींना महिलांना देखील उपलब्ध करून दिली आहे देत आहेत. फक्त बीडच नव्हे तर मुंबई पुणे छत्रपती संभाजी नगर लातूर धाराशिव या जिल्ह्यात देखील आणि ग्रामीण भागात देखील त्यांनी ऑनलाईन क्लासेस सुरू केलेले आहेत. या ऑनलाइन क्लासेसला आता थेट दुबईचे विद्यार्थी देखील प्रशिक्षण घेत आहेत. त्यांनी शिक्षकांचे प्रशिक्षणही दिले असून छत्रपती संभाजी नगर लातूर येथे फ्रेंचायासी देखील सुरू केल्या आहेत. सन २०२१ या वार्षिक बेस्ट टीचर ऑफ द इयर या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवण्यात देखील आलेले आहे. सन २०२४ मध्ये उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार पद्मश्री श्री सिंधुताई सपकाळ सेवा रत्न पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. गोरगरीब मुलींसाठी फीस मध्ये खास सवलत दिली जात असून काही विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीनुसार त्यांना मोफत प्रशिक्षण त्या देत आहेत. इंटरनॅशनल लेवलला सहभाग नोंदवून अनेक पुरस्कार त्यांनी प्राप्त केलेले आहेत. आत्ताच पुणे येथे अबॅकस इंटरनॅशनल ऑफलाइन परीक्षा पार पडल्या. या परीक्षेमध्ये उम्मेहानी यांनी आपल्या २४ विद्यार्थ्यांना सहभाग घेऊन संधी दिली होती. या परीक्षेमध्ये १४ विद्यार्थी टॉपर आले होते. त्यांच्या या शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट वेगळ्या कार्याची दखल घेऊन त्यांना पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार त्यांना जाहीर झाल्या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

जगावेगळे वेगळेपण जपणाऱ्या महिलांनी पुरस्कारासाठी संपर्क करावा - शेख आयेशा

ज्या महिलांनी शून्यातून विश्व निर्माण करत आपले अस्तित्व उभा केले आहे. अशा यशस्वी महिलांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च २०२५ रोजी सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारास पात्र असणाऱ्या मुलींनी, महिलांनी आपल्या कार्य अहवालासह तात्काळ ७० ३० १४ ९३ २२ यानंबर वर संपर्क साधावा असे आवाहन आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा यांनी केले आहे.

माजी सैनिकांच्या सहवासातून देशप्रेमाची भावना वाढीस लागेल:डॉ.हनुमंत सौदागर

नाईक सुभेदार बालाजी इंगळे यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा संपन्न

केज ■ तात्या गवळी



केज: केज तालुक्यातील कळंबआंबा येथील भूमिपुत्र बालाजी बब्रूवान इंगळे हे भारतीय सैन्यदलातून नाईक सुभेदार पदावर काम करून २४ व्या वर्षाची सेवा करून सेवानिवृत्त झाले. याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने मिरवणूक काढून त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मेजर जगन्नाथ कदम,प्रमुख पाहुणे डॉ. हनुमंत सौदागर,सरपंच शशिकांत इंगळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

गावकऱ्यांच्या वतीने नाईक सुभेदार बालाजी इंगळे यांची गावभर वाजत गाजत मिरवणूक काढली गावकऱ्यांच्या वतीने सहकुटुंब नागरी सत्कार करण्यात आला.

मिरवणुकीत भारत माता की जय वंदे मातरम या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

यावेळी बोलताना डॉ. हनुमंत सौदागर म्हणाले, सैनिक देशाच्या सीमेवर रक्षण करतात म्हणून आपण घरात सुरक्षित आहोत. जय जवान जय किसान हाच नारा देशाच्या समृद्धीसाठी महत्त्वाचा आहे.

सैनिकांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांचा कायम सन्मान झाला पाहिजे. असे मत व्यक्त केले

सत्कारमूर्ती बालाजी इंगळे यांनी यापुढे समाजसेवेसाठी तत्पर राहील असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमास परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी माजी सैनिक संघटना विविध पदाधिकारी यांच्या हस्ते हे सेवापूर्ती गौरव निमित्ताने बालाजी इंगळे यांचा सत्कार करण्यात आला.

मनुस्मृतीमुळे जनता गुलामीत गेली विज्ञानापेक्षा धर्म वरचढ झाल्यास देश रसातळाला जाईल : आनंदराज आंबेडकर

निर्भिड पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद - आ. प्रकाश सोळंके; निर्भिड पत्रकार संघाचा मूकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार वितरण सोहळा थाटात साजरा





माजलगाव ■ दर्शन डोंगरे

माजलगावः मनुस्मृतीमुळे भारत देशातील जनता बौद्धिक गुलामीत गेली होती आणि आत्ता विज्ञानापेक्षा जर धर्म वरचढ झाल्यास भारत देश रसातळाला जाईल अशी सणसणीत प्रतिक्रिया रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी व्यक्त केली ते निर्भीड पत्रकार संघ शाखा माजलगाव आयोजित मूकनायक पुरस्कार व माजलगाव भूषण सोहळ्या प्रसंगी बोलत होते'

निर्भिड पत्रकार संघ माजलगावच्या वतिन मूकनायक दिनाचे औचित्य साधून दिनांक ०६ फेब्रुवारी रोजी शहरातील वैष्णवी मंगल कार्यालय येथे मूकनायक पुरस्कार व माजलगाव भूषण पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजना केले होते

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजलगाव मतदार संघाचे विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके, उद्घघाटक रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर, प्रमुख पाहुणे म्हणून प्रखर वक्ते दीपक भाई केदार, निर्भीड पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष देवेंद्रजी ढाका, अमर साळवे , परमेश्वर सोळंके , आनंद विर , समीर काझी, किरण डोळस , मोनिका बेद्रे , आम्रपाली साबळे मूकनायक पुरस्कार प्राप्त दैनिक महाभारत चे मुख्य संपादक विजयकुमार वाव्हळ, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय दादा साळवे, मा. सभापती संभाजी शेजुळ , दै. वास्तवचे उपसंपादक अरविंद ओव्हाळ , सा. गदरचे संपादक ज्ञानेश्वर लंगे आदींची उपस्थिती होती.

प्रसंगी आनंदराज आंबेडकर म्हणाले की आपण भारतीयांनी मनुस्मृतीच्या नावाखाली खूप अन्याय अत्याचार सोसले, बौद्धिक गुलामी सोसली मात्र केंद्रातील लोक देशाला हिंदूराष्ट्र बनवण्याचे स्वप्न पाहत आहेत , विज्ञानापेक्षा धर्म वरचढ झाला तर भारत देश सर्वच गोष्टीत रसातळाला जाईल त्यामुळे केंद्रातील सरकारच्या विरोधात आपणच लोकांचा आवाज होऊन बोलत व्हायला हवे कारण आपणही मूक नायक आहोत हे दाखवून देण्याची गरज आहे तरच खरा मूकनायक दिन साजरा झाल्याचे चिज होईल .

आमदार प्रकाश सोळंके यांनी आपल्या अध्यक्षिय भाषणात बोलताना म्हणाले की गेल्या दोन महिन्या पासुन मिडियाच्या माध्यमातुन बीड जिल्ह्यातील बातम्या जोर धरत असतांना दुसऱ्या बाजुने निर्भिड पत्रकार संघाच्या वतीने कौतुकास्पद मूकनायक पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जाते याचा मला आनंद आहे. एकीकडे जिल्हा बदनाम होत असताना माजलगाव तालुका हा या सर्व बाजूना अपवाद आहे.

स्वर्गवासी संतोष देशमुख हत्ये नंतर त्यांच्या कुटुंबीयांना मदतीचा हात म्हणून पत्रकार संघ व सर्व जाती धर्माच्या वतीने पंच्चावन्न लाख रुपयांची मदत करत माणुसकी जपण्याचे काम माजलगाव मतदार संघाने केले आहे.

निर्भिड पत्रकार संघाच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना मुकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार देवून गौरविण्यात आले. निश्चितपणे हा पुरस्कार मिळाल्या नंतर पुरस्कारार्थी मान्यवर अधिक जोमाने सक्षमपणे भरिव योगदान समाजासाठी देतील हा विश्वास व्यक्त केला.

बीड जिल्ह्यातील पत्रकारिता महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाची - दीपक केदार -

बीड जिल्ह्यातील पत्रकार आणि बीड जिल्ह्याची पत्रकारिता महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाची पत्रकारिता आहे, आणि आदर्शवत पत्रकारिता आहे आम्ही बाहेर असूनही बीडचे पेपर प्रमुख्याने वाचतो इथे कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता पत्रकारिता केली जात असल्यामुळे मसाजोग येतील संतोष देशमुख यांच्या खुनाचे प्रकरण उघडे पडले आणि सरकार विरुद्ध जनता अशा लढाईत सरकार तोंडाशी पडले त्यामुळेच खऱ्या पत्रकारितेला मीडिया ट्रायल नाव दिले हे नवे फॅड आता हाणून पाडण्याची गरज आहे सरकार किंवा सरकारमधील व्यक्तीवर सत्य आरोप झाला तरीही मीडिया ट्रायल म्हणून घटनेला वेगळी बाजू देण्याचा प्रताप चालू आहेत त्यामुळे बीड जिल्ह्यातील बहाद्दर पत्रकारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून असाच गोर गरीब दिन दलित दुबळ्याच्या अन्याय अत्याचारवर लिखाण करत सर्वसामान्यांच्या पाठीशी उभा राहण्याची भूमिका ठेवावी दीपक केदार हमेशा पत्रकाराच्या पाठीशी उभा राहील असे आश्वासन दिले .

पुरस्काराला उत्तर देताना विजय साळवे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपलं वृत्तपत्र चालवताना जे लोक तोंड असूनही बोलू शकत नाही गप गुमान अत्याचार सहन करतात आशा लोकांचा आवाज म्हणून मूकनायक वर्तमानपत्र चालवले गेले मात्र सध्या पत्रकारिता क्षेत्रात धंदेवाईक लोकांचा शिरकाव झाल्यामुळे काय छापावे आणि काय नाही छापावे हे मीडियातील प्रमुख लोक ठरवू लागल्याने अनेक गोष्टीत न्याय मिळत नाही त्यामुळे निर्भीड पत्रकार संघाच्या पत्रकारांनी निर्भीडपणे दिनदलित गोरगरीब जनतेवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडावी अन् आपल्यातील मूकनायक सिद्ध करावा.

यावेळी निर्भीड पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब आडागळे, परमेश्वर सोळंके, अमर साळवे, शेख हमिद , राजरतन डोंगरे, सिद्धेश्वर गायकवाड, संतोष रासवे, विजय डावरे , विजय कापसे , प्रचंड सोळंके , मुंजा गाडेकर , आनिकेत भिलेगावकर , तेजस शिंदे , गणेश तौर , दत्ता जाधव , रामभाऊ यादव , रंजित अडागळे आदिनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले माजलगाव शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातून महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यांचा झाला सन्मान -

संपादक विजयकुमार वाव्हळ , संपादक ज्ञानेश्वर लंगे , उपसंपादक अरविंद ओव्हाळ , रिपाई जिल्हाध्यक्ष विजयदादा साळवे , मा. सभापती संभाजी शेजुळ , डॉ. कोडगिरकर , शिवाज्ञा कोचिंग क्लासेस चे अध्यक्ष जिवन नखाते सर , चेअरमन सागर खुर्पे , मुख्याध्यापक किशोर मोताळे सर , नवनाथ गिलबिले सर , सरपंच भागवत शेजुळ , ग्रामसेवक आनंदकुमार सिरसट , ?ड. अजित जगताप , तलाठी प्रमोद चव्हाण , उद्योजक पद्माकर कांबळे , नगर सेवक शरद यादव , पाटिल प्रतिष्ठान चे अध्यक्ष श्रीराम नरवडे , महसुल सेविका सौ. कौशल्याताई लोखंडे , जकिबाबा फाऊंडेशनचे शेख शौकत , संध्या आकाश जाधव.

सामाजिक कार्याचा वसा जपणारे बाबा इनामदार एक आदर्श!

टाकळी हाजी पुणे प्रतिनिधी ■ शेख शौकत मुजावर



टाकळी हाजी (पुणे) : शिरूर तालुक्यातील पाबळ गावचे सुपुत्र बाबा इनामदार यांच्या कार्याची चर्चा तालुका नव्हे तर जिल्ह्यात केली जात आहे.

पाबळ गाव हे दुष्काळजन्य परंतु बाबा इनामदार व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रेरित होऊन गावातील पाणी प्रश्न दूर व्हावा म्हणून सतत शासन दरबारी पाठपुरावा करत टँकर मुक्त गाव व्हावे म्हणून सदैव प्रयत्न केला आहे. समाजसेवेचा वसा लाभलेले बाबा इनामदार हे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, पत्रकारिता क्षेत्रात सतत अग्रेसर समाजातील नागरिकांचे वेगवेगळे प्रश्न सुटावे म्हणून पोलीस प्रशासन, तहसील कार्यालय तसेच विविध जातीचे दाखले मिळावे म्हणून सतत प्रयत्न करत असतात. गावात राम रहीम ही संकल्पना रुजावी म्हणून गणपती मंडळे, रमजान, मोहरम सणात स्वतः युवकांशी संवाद साधत हसतमुखाने आपल्या वकृत्व कलेने तरुणांची मने जिंकत आहेत.

शैक्षणिक क्षेत्रात ते नेहमीच विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून विविध विद्यालयात उपक्रम घेत ' शिकाल तर टिकाल' हा नव संदेश देण्याचे काम करतात. पत्रकारिता हा त्यांचा पिंडा असला तरी ते पत्रकारिता आणि समाजकार्याला महत्त्व देणारे नागरिकांना न्याय देणारे एक व्यक्तिमत्व म्हणून ओळख निर्माण करत सर्व पाबळ वासियांच्या गळ्यातील ताईत बनले असुन त्यांच्या कार्याची दखल घेत अनेक सामाजिक संस्थांनी त्यांना पुरस्कार देवून गौरव केलेला आहे.

फकीरा मारुती जाधव यांचा सन्मान



मंचर ■ संतोष गावडे

अत्याधुनिक युगातील फकीरा मारुती जाधव यांचा सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्य व शिवशाही व्यापारी संघाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

माता-भगिनींच्या संरक्षणार्थ शहरातील युवकांनी फकीरा प्रमाण वागलं पाहिजे जगलं पाहिजे समाजातील कोणत्याही माता भगिनी वरती अन्याय करण्यात आला तर फकीरा प्रमाण त्यांच्या विचाराचा वारसा कायम तेवत ठेवण्यासाठी युवकांनी अग्रेसर राहील पाहिजे असं प्रतिपादन ज्येष्ठ नेते नानासाहेब कांबळे यांनी व्यक्त केला.

सामाजिक कार्यकर्ते मारुती जाधव यांनी महिलांच्या संरक्षणार्थ जी ठोस भूमिका घेतली त्या भूमिकेचे स्वागत लोकसेवक युवराज दाखले यांनी करून त्यांचा श्रीफळ, हार व सा लो डॉ आण्णा भाऊ साठे लिखित फकिरा कांदबरी देऊन उचित सन्मान करण्यात आला.

यावेळी शिवशाही व्यापारी संघटनेचे शहराध्यक्ष शिवाजीराव खडसे, पुणे जिल्हा अध्यक्ष गणेश कलवले, कार्याध्यक्ष अमोल लोंढे, प्रदेश उपाध्यक्ष मंगेश डाखोरे, महासचिव सूरज आण्णा कांबळे, आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

उमेद अंतर्गत ग्रामसंघ उपसमिती प्रशिक्षण वर्गास मुख्यमंत्री 'लाडकी बहीण' योजनेच्या दीपाली खोत, यांची भेट

कराड ■ अनिल मोरे



कराड : मसूर येथे उमेदअंतर्गत कल्पतरू प्रभाग संघ. मसूर ग्रामसंघ उपसमिती प्रशिक्षण वर्गास अध्यक्ष मुख्यमंत्री 'लाडकी बहीण' योजना शासकीय समिती मा. दिपालीताई खोत, यांनी प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी २१ गावांमधील प्रत्येकी तीन महिला प्रतिनिधी अशा ६३ महिला या महत्त्वपूर्ण बैठकीला उपस्थित होत्या. या कार्यक्रमा प्रसंगी बोलताना दिपालीताई खोत, म्हणाल्या महिला ही आता अबला नारी, नसून सबला नारी, आहे. ती आता पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रामध्ये उत्तम कामगिरी करू शकते. त्याचबरोबर समाजात सन्मानाने मान उंचावून चालू शकते. आता महायुती सरकारने सुद्धा मान्य केले आहे की महिलांची शक्ती मोठी आहे. महिलांनी मनात आणले तर सत्ता परिवर्तन सुद्धा निश्चित करू शकते. त्यामुळे महायुती सरकार विशेष करून महिलांच्या बाबतीत खूप सकारात्मक आहे. तसेच सरकारची 'लाडकी बहीण' योजनेमुळे गोरगरीब कष्टकरी महिलांचा स्वाभिमान जागी झाला आहे. महिलांना यापुढे कोणासमोर हात पसरण्याची गरज नाही. यापुढे महिलांनी स्वतःच्या स्वकर्तृत्वावर छोटे मोठे व्यवसाय उद्योग सुरू करावे त्यासाठी केंद्र व राज्य शासन प्रधानमंत्री स्वयंरोजगार कर्ज योजना, मुख्यमंत्री स्वयंरोजगार कर्ज योजना, अन्नप्रक्रिया व्यवसाय कर्ज योजना, मुद्रा कर्ज योजना अश्या अनेक योजना राबवत आहे. असेही त्यांनी सर्व महिलांना प्रोत्साहन दिले.

या कार्यक्रमावेळी अध्यक्ष मुख्यमंत्री 'लाडकी बहीण' योजना शासकीय समिती दीपालीताई खोत, प्रभाग संघ अध्यक्षा गीतांजली इंगवले, किवळ ग्रामसंघ प्रेरिका रेखा साळुंखे, प्रशिक्षिका मयुरी बाजरे, प्रतिभा कुंभार, योगिता जाधव, रुपाली भांडवले, अश्वीनी पवार, सुषमा चव्हाण, शैला चव्हाण, किरण गोसावी, सुरेखा चव्हाण, राधा यादव, शुभांगी पवार, व आदी महिला मोठया प्रमाणात उपस्थित होत्या.

जि.प. प्रा .शा .कोठारबन शाळेतील खेळाडूची राज्यस्तरीय लांब उडी स्पर्धेसाठी निवड

बीड ■ गितांजली लव्हाळे



बीड वडवणी : दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी छ .संभाजी नगर येथे औरंगाबाद डिस्ट्रिक्ट ?थलेटिक्स असोसिएशन द्वारा आयोजित डिस्ट्रिक्ट सब ज्युनिअर ?थलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ मध्ये १२ वर्ष वयोगटातील लांब उडी प्रकारात

जि प प्रा शा कोठारबन ता वडवणी जि बीड शाळेची मुलींमध्ये समृद्धी सुधाकर मुंडे २ रा क्रमांक व चि सौम्य जालिंदर भस्करे याने तिसरा क्रमांक मिळवत पंढरपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत धडक मारली आहे.

या यशाबद्दल विजयी खेळाडूंचे व त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडा मार्गदर्शक श्री रमेश धाईतिडक सर व श्री जालिंदर भस्करे सर यांचे वडवणी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री बाबासाहेब उजगरे, केंद्रप्रमुख श्री सुनील मुंडे तसेच श्री गणेश धाईतिडक, शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रभाकर तिडके, कोठारबन गावचे सरपंच श्री अशोक मुंडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री संतोष घुले तसेच सर्व गावकर्यांनी अभिनंदन केले आहे व दि २३ फेब्रुवारी २०२५ रोजी पंढरपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

अखिल भारतीय मजदूर कल्याण सेवा संघ व भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमानाने लाडक्या बहिणींना आत्मनिर्भर करण्यासाठी अभयाची वाडी येथे महिला मेळाव्याचे आयोजन

कराड ■ कुलदिप मोहिते



कराड : अखिल भारतीय मजदूर कल्याण सेवा संघ नवी दिल्ली भारत सरकार व भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमानाने लाडक्या बहिणींसाठी, महीलांसाठी स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी, आत्मनिर्भर करण्यासाठी महिला मेळाव्या समारंभाचे आयोजन दिनांक ६ रोजी अभयचीवाडी तालुका कराड येथे करण्यात आले होते. विविध कार्यक्रमातून महिलांना स्वतःच्या कलागुणांना व कर्तुत्वाला दाखवण्याची संधी कशाप्रकारे मिळते या संदर्भातील मार्गदर्शन मेळाव्यात करण्यात आले. . तसेच शासकीय योजनांची , बचत गटाविषयी माहिती देवून छोट्या छोट्या लघुउद्योगाच्या , व्यवसायाच्या माध्यमातून महिलांना स्वतःच्या पायावर आत्मनिर्भर कसे होता येईल याविषयीचे मार्गदर्शन मेळाव्यात करण्यात आले

महिलांवरील अत्याचार गुन्हे थांबवण्यासाठी महिलांच्या सुरक्षा व विकासासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांची व नियमांची माहिती याप्रसंगी देण्यात आली महिलांमध्ये एक प्रकारची ऊर्जा निर्माण करण्यासाठी महिला मेळावा आयोजित करणे का गरजेचे आहे याचे महत्त्व पटवून देण्यात आले. तसेच सेवा निवृत्त सैनिकांचा सन्मान सोहळा यावेळी घेण्यात आला बचत गटाच्या सीआरपी व महिला सरपंच उपसरपंच तसेच इतर कर्तुत्ववान महिलांचाहीय सन्मान यावेळी करण्यात आला.

महिलांची भारतीय जनता पक्षाशी नोंदणी ही यावेळी करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीलम देशमुख यांनी केले तर कार्यक्रमाची सांगता मीनाक्षीताई पोळ यांनी राष्ट्रगीताने केली व सर्व महिलांना हळदी कुंकवाचा मान दान देऊन त्यांचा सन्मान यावेळी करण्यात आला

यावेळी कार्यक्रमास संघाच्या पुणे मंडळाच्या अध्यक्षा व भारतीय जनता पक्षाचा उत्तर मंडलाध्यक्षा ,पोलिस मित्र संघटनेच्या कराड तालुका अध्यक्ष श्रीमती वनिता सुर्वे, तालुका अध्यक्ष माधुरी थोरवडे, नीलम देशमुख, निरुपमा देशमुख, अंकिता सुर्वे, शरद काटकर. इत्यादी उपस्थित होते

कथित पंटर मोहन संख्येने अधिकाऱ्यांच्या टराटरा फाढल्या चड्ड्या

परभणी ■ दत्तात्रय कराळे



खंडणी आणि वसुली, हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो आम्ही तुम्हा करदात्यांच्या उरावर बसून मिळवणारच,' अशी भीष्मप्रतिज्ञा करत नव्हे, तसे बोधवाक्यच बनवले असल्याचे ठरवून काही कथित अधिकारी अत्यंत मग्रुरीने वागत असतात. अशा अनेक कारणांमुळे बहुचर्चित असलेल्या वसई-विरार शहर महापालिकेत एका पाठोपाठ एक अशी नानाविध प्रकरणे सतत चव्हाट्यावर येत असल्याने या महापालिकेच्या अब्रूची लक्तरे दिवसेंदिवस वेशीवर टांगली जात आहेत.

सदर महानगरपालिकेतील काही अधिकाऱ्यांनी तर कंबरेचे सोडून डोक्याला गुंडाळले आहे. वरीष्ठ अधिकारी म्हणून मनपाचे सर्वेसर्वा असलेले अनिलकुमार पवार आणि त्यांच्या दिमतीला असलेले रमेश मनाले या दोघांनी तर गेल्या तीन वर्षाच्या कार्यकाळात महानगरपालिकेची तिजोरी पूरती लुटून खाल्ली असल्याची चर्चा सर्वत्र चवीने चर्विली जात आहे..

वसई विरार मनपा क्षेत्रात, नव्हे नव्हे, संपूर्ण उपप्रदेशात या दोघांचे अनेक खंडणीखोर पंटर्स जागोजागी पेरलेले असून त्यांनी क्षेत्रात सर्वत्र मोठा हैदोस घातला आहे. त्यांच्याच एका पंटरने अगदी दोन दिवसांपूर्वीच हे सर्वकाही गोरखधंदे एका ऑडिओ क्लिपने सिद्ध करून दाखवले आहेत. मोहन संख्ये नामक पंटरने तर आपले वरीष्ठ वसुलीच्या पैशासाठी कसा तगादा लावतात, हे या ऑडिओ क्लिपमधून चव्हाट्यावर आणले आहे. मनाले सोबत 'कुठे' नामक अधिकाऱ्याचे देखील आर्थिक हितसंबंध गुंतले असल्याचा उल्लेख त्यांनी केला आहे. या कुठे,' नावाच्या कथित अधिकाऱ्यांनी गेल्या दोन वर्षात किती माया जमवली, याची चौकशी झाल्यास आपल्यावर डोळे पांढरे व्हायची पाळी येईल, असा अगदी जाहिरपणे बोभाटा केला आहे. त्याचाच दंडणीय परिपाक म्हणून या संख्येला निलंबित करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. पण त्याच्या निलंबनाची कागदोपत्री नोंद असल्याची अधिकृत अशी प्रतहीकाही दिली जात नाही. तसे लेखी प्रत जर माध्यमांना दिली तर मात्र हाच संख्ये आपल्या सर्वांच्या चड्ड्या टराटरा फाडून आपल्याला पूरता नागडा केल्याशिवाय राहणार नाही, जणू याचीच भिती या अधिकाऱ्यांना वाटली जाणे स्वाभाविक आहे. कदाचित त्यामुळेच ते संख्येच्या निलंबनाची अधिकृत प्रत देण्यासाठी धजावत नसावेत. तसं बघितले तर सदर नामांकित अधिकाऱ्यांना अशाप्रकारची कोणतीही भिती बाळगण्याचे कारणच नाही, याचे कारण म्हणजे जे अगोदरच नागडे आहेत, त्यांच्या चड्ड्या हा संख्ये काढणार तरी कशा? मागील अनेक वर्षांपासून या महानगरपालिकेत सर्वसामान्य करदात्यांच्या पैश्याची खुलेआम मोठ्या प्रमाणात लूट सुरु आहे. तेही मुळीच लपून राहिलेले नाही.

आजी-माजी लोकप्रतिनिधी, अधिकारी, ठेकेदार आणि समाज सेवेचा बुरखा पांघरून कांहींच्या संगनमताने वसूलीचे हे गोरखधदे अगदी बिनधास्तपणे सुरु आहेत.

नुकताच एका सामाजिक कार्यकर्त्याने आपल्या लाईव्ह मुलाखतीमध्ये या वसुली प्रकरणी काही दिवसांपूर्वीच निवडून आलेल्या आमदारावर बेछूट आरोप केल्यामुळे मतदार व करदात्यांनाही आश्चर्याचा मोठा धक्काच बसला आहे. बोईसर मतदारसंघाच्या वसई भागात वसुली कशी केली जाते, या आमदारांचे पंटर्स चक्क कार व फ़ॉर्च्यूनर गाड्यांतून वसूली करत कसे फिरतात, याचे रसभरीत वर्णन केले. याचाच अर्थ असा की, अशा या सर्वांनीच सदर महानगरपालिकेचे लचके तोडण्यास बिनाबोभाट सुरुवात केल्याचे स्पष्ट होत आहे.

या महानगरपालिकेतील काही अधिकाऱ्यांना ईडीच्या नोटीसा आल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. तथापि राज्यातील एक बलाढ्य राजकीय नेता, यासंदर्भात मध्यस्थाची भूमिका बजावत असल्यामुळेच पुढील कारवाई तूर्त तरी थंडावली आहे. दरम्यान, काही नेते एकीकडे महानगरपालिकेच्या विविध विभागातील भ्रष्टाचार प्रकरणाची माहिती मिळावी, यासाठी पत्रप्रपंच करीत आहेत, तर दुसरीकडे त्यांचीही नांवे या प्रकरणात गोवली गेल्याचे समोर येत असल्याने शहरातील अनेक करदाते मात्र संभ्रमावस्थेत सापडले आहेत एवढे निश्चित आहे.

माजलगावात प्रथमच महाराष्ट्र शासन आयोजित भारुड महोत्सव संपन्न

माजलगाव ■ दर्शन डोंगरे



माजलगाव :सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई आयोजित भारुड महोत्सव दि. २९ ते ३१ जानेवारी दरम्यान येथील मॉ वैष्णवी मंगल कार्यालयात संपन्न झाला.

या भारुड महोत्सवात ख्यातनाम राष्ट्रीय भारुडकार श्रीमती चंदाताई तिवाडी, संतोष भालेराव, श्रीमती कृष्णा उळेकर, सय्यद हमीद, अनिल केंगार, श्रीमती संध्या साखी, महादेव शेंडे, शेखर भाकरे, जननी देवी भजनी मंडळ (गोळेवाडी ता भोर जिल्हा पुणे), लक्ष्मण राजगुरू, श्रीमती धनश्री जोशी, जगन्नाथ खरात, नारायण देव भजनी व भारुड मंडळ (भालगुडी ता मुळशी जिल्हा पुणे), यांनी तीन दिवसांत शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या समस्या, व्यथा, स्त्री भ्रूणहत्या, बालविवाह, व्यसनमुक्ती, महिला सबलीकरण, अंधश्रद्धा निर्मूलन, पर्यावरण संवर्धन, पाणी बचत, मुलींचे शिक्षण यांसारख्या विविध विषयांवर भारुडातून समाजाचे प्रबोधन केले.

यावेळी विशेष उपस्थितीत विकास खारगे (भा प्र से- मुख्यमंत्री अप्पर मुख्य सचिव तथा अप्पर मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई), बिभीषण चवरे (संचालक- सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई), संजय अमृतराव (सहायक लेखाधिकारी- सांस्कृतिक कार्य विभाग छत्रपती संभाजीनगर), गौरव इंगोले (उपविभागीय अधिकारी- माजलगाव), श्री बी धिरज कुमार पोलीस उप अधिक्षक माजलगाव मा. आ. मोहनराव काका सोळंके, गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी इत्यादी मान्यवर उपस्थित होते तसेच माजलगाव शहर व ग्रामीण भागातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अप्रतिम ठरलेल्या भारुड महोत्सवाच लाभ घेतला.

यावेळी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त राष्ट्रीय भारुडकार यांनी भारुड याविषयावर मार्गदर्शन केले. या भारुडाची सुरुवात महाराष्ट्र राज्य गीताने झाली, महाराष्ट्र राज्य गीत चैतन्य आहेर यांनी सादर केले. भारुड महोत्सवाचे प्रास्ताविक पंडित मेंडके यांनी केले, आभार अरुण सोळंके, सुत्रसंचलन अशोक वाडेकर, अरुण सोळंके यांनी केले.

व्हीएसपीएम कॉलेज ऑफ नर्सिंग, काटोलच्या दुसऱ्या बॅचच्या जीएएनएम नर्सिंगच्या विद्यार्थ्यांसाठी दीपप्रज्वलन सोहळ्याचे आयोजन

काटोल ■ प्रशांत पवार





काटोलः व्हीएसपीएम कॉलेज ऑफ नर्सिंग, काटोलच्या वतीने २१/०१/२०२५ रोजी लता मंगेशकर हॉस्पिटल कॅम्पस काटोल येथे दीपप्रज्वलन समारंभ आयोजित करण्यात आला. हा अथक सेवेचा आणि प्रेरणादायी कार्यक्रम नर्सिंगच्या विद्यार्थ्यांच्या आरोग्य सेवेच्या उत्कृष्ट व्यवसायात औपचारिक दीक्षा दर्शवितो.

या समारंभाला प्रमुख पाहुणे डॉ वाय प्रवीण कुमार, डीन अलाईड फॅकल्टी श्ळए, नाशिक, सन्माननीय अतिथी माननीय श्री चंद्रशेखर देशमुख (संचालक व्हीएसपीएमएएचई, नागपूर) उपस्थित होते. श्री राहुल रंनावरे, प्रा व्हीएसपीएम कॉलेज ऑफ एज्युकेशन, काटोल, अध्यक्षा डॉ आशा शिमगेकर, नर्सिंग डायरेक्टर व्हीएसपीएम एमडीआयएन डिगडोह हिल्स नागपूर, डॉ रेखाराणी सिंग, प्राचार्य व्हीएसपीएम कॉलेज ऑफ नर्सिंग, काटोल आणि उपप्राचार्य डॉ. सुषमा मानवटकर, व्हीएसपीएम कॉलेज ऑफ नर्सिंग आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. ज्ञान, करुणा आणि आधुनिक नर्सिंगचे प्रणेते फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रेरणादायी सेवेचे यावेळी स्मरण करण्यात आले.

प्रमुख पाहुणे डॉ वाय प्रवीण कुमार यांनी आपल्या भाषणात समर्पण, सहानुभूती आणि व्यावसायिकतेच्या महत्त्वावर भर दिला. रुग्णांची काळजी आणि सेवेच्या वचनबद्धतेची पूर्ती करणाऱ्या विद्यार्थ्यांनी नाइटिंगेल प्रतिज्ञाचे वाचन केले.

प्राचार्या डॉ रेखाराणी सिंग यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच सक्षम आणि करुणामयी आरोग्य सेवा व्यावसायिक बनण्याच्या त्यांच्या प्रवासातील या मैलाच्या दगडाचे महत्त्व विषद केले.

कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली आणि त्यानंतर हा अविस्मरणीय क्षण टिपणारा ग्रुप फोटो घेण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष श्री रणजीतबाबू देशमुख, उपाध्यक्ष डॉ आशिषराव देशमुख, एमडीआयएनइच्या प्राचार्य श्रीमती आम्रपाली गजभिये, बीएड कॉलेजचे प्राचार्य डॉ किशोर वाठ यांनी या नर्सिंग कॉलेजसाठी अथक प्रयत्न घेतले आहेत.

भारतीय बौध्द महासभा शाखा जयभोले नगर यांच्या संयुक्त विघमानाने त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२७ वी जयंती साजरी



खापरखेडा ■ दिलीप येवले

खापरखेडाः दरवर्षीप्रमाणे यावर्षी हि मानसिक, बलाची शक्ती व त्यागाची महानमूर्ती, माता रमाई यांची जयंती मोठ्या उत्साहाने सुजाता महीला मंडळाच्या वृतीने जयभोले नगर येथील सुजाता बुध्द विहारामध्ये ७ फेब्रुवारीला २०२५ रोजी साजरी करण्यात आली. सर्वप्रथम सामाजीक क्रांतीच्या लढ्यात संपूर्ण आयुष्य वेचणाऱ्या संत महापुरुषांना पुष्पमालेने स्वागत करण्यात आले. दीप प्रज्वलित करून नंतर संघर्ष, सहनशीलता आणि त्याग यांचा अद्वितीय संगम अशा माता रमाई यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषणे झाली. त्यानंतर सर्व उपासक व उपासिकेच्या उपस्थितीमध्ये केक कापण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हरिश्चंद्र पाटील यांनी केले व आभार प्रदर्शन शाखेच्या उपाध्यक्ष वैशाली रामटेके यांनी केले. मंचावर उपस्थित अध्यक्ष कृष्णाजी नानवटकर, उपाध्यक्ष वैशाली रामटेके, पुष्पाताई येवले, वियजा चव्हाण, सुकेशेनी खांडेकर, सामाजीक कार्यकर्ता शशिकला बन्सोड, लक्ष्मी पार्टील, पुष्पाताई वाघमारे, जयमाला पाटील, वैशाली ढोरे, सायली मानवटकर, मिलिंद पाटील, गंगाधर गजभिये, सिध्दार्थ बागडे, सुधाकर, खांडेकर, भीमराव बागडे, केवलराब सोमकुवर, गौतम रामटेके, चंद्रकला सोमकुवर, निर्मलाताई बागडे आदी मान्यवर उपस्थित होते.

सांस्कृतिक महोत्सवात बालकांच्या कलागुणांची उधळण

विरुळ (आ.) ■ विनोद महाजन



विरुळ आकाजी ; जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा क्रमांक २, विरूळ (आ.) येथे वार्षिक स्नेहसंमेलन व सांस्कृतिक महोत्सव मोठ्या थाटात साजरा झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा मा. सौ. शिल्पाताई देऊळकर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून आर्वी पं. स. चे गटशिक्षणाधिकारी मा.श्री सुरेश पारडे साहेब, माजी पं. स.सदस्य सौ. शोभाताई मनवर, माजी सरपंच श्री दुर्गाप्रसादजी मेहरे , हुसेनपूरच्या उपसरपंच मा. सौ. साधना मुंडेकार, माजी ग्रामपंचायत सदस्य श्री कैलासजी उपासे ,विरूळ केंद्राचे केंद्रप्रमुख मा. श्री विजय लोणारे, सोरटा केंद्राचे केंद्रप्रमुख मा. श्री. विलास तराळे, तलाठी श्रीमती मीनल माळोदे, डॉ. जयश्री सोनवणे, विशेष शिक्षक श्री सुनील शंभरकर,आरोग्य कर्मचारी श्री गजानन थेटे, शाळा व्य.स. चे उपाध्यक्ष श्री सुशील नेवारे, जि.प.केंद्र शाळेचे मुख्याध्यापक श्री नाखले सर उपस्थित होते.

स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शाळा स्तरावर घेतलेल्या विविध क्रिडा स्पर्धेत प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे सर्व क्षेत्रात प्रावीण्य दाखवणाऱ्या ' अमोली अंबादास पटेकार ' या विद्यार्थिनीचा ' उत्कृष्ट विद्यार्थी ' म्हणुन गुणगौरव करण्यात आला. यात विद्यार्थ्यांनी विविधरंगी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून रसिकांची दाद मिळविली. जि.प.प्रा. केंद्रशाळा विरूळ तथा अंगणवाडीतील चिमुकल्यांनी सुध्दा आपल्या कलेचे सादरीकरण केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शितल वडनेरकर यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पूनम हनवते यांनी तर आभार प्रदर्शन श्रीमती भाग्यश्री मुडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती बनसोड मॅडम तसेच शाळेची माजी विद्यार्थीनी कु. आचल मून यांनी सहकार्य केले.

नूतन कन्या विद्यालय तळेगाव श्यामजीपंत या शाळेतील विद्यार्थी मयूर सुनील पाटील जिल्ह्यातून प्रथम



तळेगाव ■ प्रतिनिधी

तळेगाव : अश्वघोष सांस्कृतिक मंच वर्धा यांनी आयोजित केलेल्या भारतीय संविधान अमृत महोत्सव वर्षानिमित्त जागर संविधानाचा संकल्प कृतीशील होण्याचा ही अभियान मागील जानेवारी २०२४ पासून राबविण्यात येत आहे त्याच्याच एक भाग म्हणून विद्यार्थी पालक शिक्षकांनी समाजामध्ये संविधानाबद्दल जनजागृती व्हावी या स्पर्धेमध्ये आमच्या विद्यालयाच्या मयूर सुनील पाटील वर्ग नववा याने वर्धा जिल्ह्यातून प्रथम क्रमांक चा मानकरी ठरलेला आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ पाटील मॅडम, पखाले सर, दलाल सर, बनसोड मॅडम, अजमीरे मॅडम, मोरे मॅडम, भांडेकर सर, गाडगे मॅडम, कोडापे मॅडम, आशाबाई यांनी त्याचे कौतुक व अभिनंदन केले.

तायवाडे कॉलेजमध्ये 'डाटा ॲनालिस्ट' या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडीः स्थानिक तायवाडे कॉलेज, महादुला- कोराडी येथे प्लेसमेंट सेल आणि कॉम्प्युटर सायन्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'एम्प्लॉयबिलिटी स्किल डेव्हलपमेंट प्रोग्राम , डेटा अनालिस्ट' या विषयावर १३ जानेवारी २०२५ ते १३ मार्च २०२५ या दरम्यान संगणक विभागात प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले . या शिबिरासाठी तायवाडे महाविद्यालयाद्वारे सेंटम फाउंडेशन, नवी दिल्ली यांच्या सोबत ८ जानेवारी २०२५ ला करार करण्यात आला .या प्रशिक्षणासाठी प्रताप यादव, नवी दिल्ली यांचे मार्गदर्शन लाभले. या प्रशिक्षण शिबिरामध्ये १०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आणि प्रशिक्षण सुरू झाले. प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन तायवाडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे यांच्या अध्यक्षतेखाली व श्री प्रताप यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या कार्यक्रमाप्रसंगी प्राचार्य डॉ शरयु तायवाडे प्रताप यादव,संगणक विभाग प्रमुख प्रा. डॉ. गिरीश काटकर, प्रा .डॉ. अजय रामटेके विचारमंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. पूजा उके, प्रा मोनिका पटले, प्रा. शलाखा गायकवाड, प्रा. डॉ. वर्षा वैद्य, राकेश गेडाम इत्यादी प्राध्यापक वर्ग आणि प्रशिक्षणार्थी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अजय रामटेके यांनी विशेष श्रम घेतले.

लोकाभिमुख महसूल प्रशासन शिबीर संपन्न

विरुळ (आ.) ■ विनोद महाजन



विरुळ आकाजी : मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री यांचे १०० दिवसांच्या ७ कलमी कार्यक्रमांतर्गत लोकांची कामे जलदगतीने व्हावी यासाठी महसूल विभागाच्या वतीने विरुळ आकाजी येथील मंडळ कार्यालयात लोकाभिमुख महसूल प्रशासन शिबिर घेण्यात आले. तहसीलदार श्री हरिश काळे यांच्या हस्ते शिबीराचे उदघाटन झाले

तहसीलदार हरिश काळे,मंडळ अधिकारी अशोक बनसोड यांच्या हस्ते महसुली प्रकरणातील आदेश,विविध प्रमाणपत्रे शेतकरी, नागरिकांना वाटप करण्यात आले

शिबिरात वहिवाटिचा रस्ता मोकळा करण्याबाबत आदेश पारीत करण्यात आला.

कलम १५५ अंतर्गत दुरुस्ती चे आदेश,अँग्रीस्टॅक बाबत ३० लोकांची नोंदणी करण्यात आली

तहसीलदार श्री हरिष काळे यांचे मार्गदर्शनात केलेल्या या शिबिरात अनेक योजनेचे पेंडिंग कामे निकाली काढले

रसुलाबाद येथील निखिल गुल्हाने यांचे चार वर्षापासून सातबारा आठ अ प्रलंबित होता तोही आज दुरुस्ती करूनङ फेरफार घेऊन त्या शेतकऱ्याच्या हातात दुरुस्ती करून देण्यात आला त्यामुळे लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव उमटले होते.

नागरिकांना प्रमाणपत्र वाटप

इतर विविध प्रकरनाचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले

शिबिरात अनेक लोकांनी भेट दिलीमा.जिल्हाधिकारी वानमथी मॅडम, उपविभागीय अधिकारी शिरसाट यांचे मार्गदर्शनाखाली मंडलनिहाय शिबीर घेऊन कामे निकाली काढण्याचे नियोजन आहे

यांचा होता शिबिरात सहभाग तहसीलदार हरिश काळे,मंडळ अधिकारी अशोक बनसोड,विरुळ येथील तलाठी मीनल माळोदे,रसुलाबाद येथील तलाठी प्रतिभा जवंजाळ, पाचोड येथील तलाठी गौरव भोयर, सोरटा येथील तलाठी मिलिंद पाठक,तसेच महसूल कर्मचारी व अनेक शेतकरी,नागरिक उपस्थिती होते

अँग्रीस्टॅक नोंदणी जास्त

यावेळी परिसरातील शेतकऱ्यांनी अँग्रीस्टॅक नोंदणी जास्त प्रमाणात करण्यात आले आहे तसेच मे केंद्रात जाऊन अँग्रीस्टॅक बाबत नोंदणी लवकरात लवकर करून घ्यावी असे आवहान करण्यात आले.

पोरवाल महाविद्यालयात केसरी कलारंगची सांगता

कामठी ■ दिलीप येवले



कामठी : स्थानिक सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालयात केसरी कलारंग अर्थात सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत ३ फेब्रुवारी पासून सुरु असलेल्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कलारंगची सांगता ५ फेब्रुवारीला करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कर्नल विकास शर्मा, कामान्डीग ऑफिसर २० महाराष्ट्र बटालियन, नागपुर यांनी जीवनात लक्ष्य गाठण्यासाठी जिद्द, चिकाटी, परिश्रम आणि निरंतर सराव करण्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचे विशेष अतिथी श्री. सचिन बनकर, प्राचार्य भारतरत्न इंदिरा गांधी कनिष्ठ महाविद्यालय, कन्हान यांनी शिस्त पालनाचे महत्व विषद करतांना जीवनात यशस्वी होण्यासाठी सर्वांना नियम व शिस्तीचे पालन करण्याचे आव्हान केले. महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यक्रम अध्यक्ष यांनी प्रो.डॉ. विनय चव्हाण, यांनी केसरी कलारंगतून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून ते जीवनातील प्रत्येक क्षेत्रात उंच भरारी घेतील अशी आशा व्यक्त केली. केसरी कलारंग दरम्यान आयोजित स्पर्धेत मुशायरा-डॉ. अजहर अबरार, नृत्य-डॉ.आशा रामटेके, नाटक-डॉ.महेश जोगी, गीत गायन-डॉ.विनोद शेंडे, आनंद मेला-डॉ. रेणुका रॉय या समन्वयकांनी घेतलेल्या परिश्रमाची पावती देत स्पर्धकांनी कार्क्रमाची रंगत वाढवली. आयोजित विविध स्पर्धेत विजयी प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त मिळविलेल्या स्पर्धकांना बक्षीस देवून मान्यवरांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. मनिष चक्रवर्ती, उपप्राचार्या प्रा. डॉ. रेणू तिवारी, डॉ. स्वप्नील दहात, डॉ. नितीन मेश्राम, डॉ. संजीव शिरपूरकर, डॉ. इफ्तेखार हुसैन, डॉ. प्रशांत बाम्बल, डॉ. यशवंत मेश्राम, डॉ. जयंत रामटेके, डॉ. सिद्धार्थ मेश्राम, डॉ. दिपक भावसागर, डॉ. तुषार चौधरी, डॉ. रतिराम चौधरी, डॉ. प्रशांत धोंगळे, लेफ्टनंट मोहमम्द असरार, डॉ. जितेंद्र तागडे, डॉ. राजेंद्र मुंगमोडे, डॉ. राजेश पराते, डॉ. इंद्रजीत बसू, डॉ. किशोर ढोले, डॉ. तारुण्य मुलतानी, डॉ. सुदीप मोंडल, डॉ. विकास कामडी, ग्रंथपाल शिल्पा हिरेखण, रजिस्ट्रार स्वप्नील राठोड सहित प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरफराज अंसारी व आर्या बागडे तर आभार कलारंग कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ.गिजाला हाश्मी यांनी मानले.

उर्जा विभाग शेतकर्यांचे दारावर अधिकार्यांनी समजावून सांगितले सौर उर्जा चे महत्व ; महाराष्ट्र शासनाची मागेल त्याला सौर कृषी पंप योजना

काटोल ■ प्रशांत पवार



काटोलः नागपूर जिल्ह्यातील कोंढाळी वीज उपविभागीयक्षेत्रातील कोंढाळी-काटोल जोड रस्त्यावर कोंढाळी व लगतच्या गावातील अनेक शेतकऱ्यांचे उपस्थितत. वीज विभागाचे अधिक्षक अभियंता राजेश नाईक, तसेच कोंढाळी उप विभागीय वीज अधिकारी यांनी मागेल त्याला सौर ऊर्जा पंपाचे संकल्पने बाबद माहिती दिली. तसेच एच. पी. ते साडे सात एच पी. पर्यंत सौर उर्जेवर संचालीत उपकरणांच प्रात्यक्षिक ही करून दाखवले. तसेच या प्रसंगी उपस्थित अल्प भू धारक ते बडे शेतकरी ही उपस्थित होते.

या प्रसंगी महाराष्ट्र शासनाद्वारे आता 'मागेल त्याला सौर कृषी पंप' दिला जात आहे. यासंबंधी अधिकृत अशी घोषणा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वतीने करण्यात आली आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप योजना साठी अर्ज देखील आता सुरू झाले आहेत, स्प्रेम्दस्मार्फत अर्ज करायचा आहे.

नवीन पोर्टल सुरू करण्यात आले आहे, त्यामुळे आता सर्व इच्छुक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी सौर कृषी पंप भेटणार आहे.

काटोल कोंढाळी सह नागपूर जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना सौर कृषी पंप देण्याचा उद्देश या योजनेचा आहे. कृषी पंप पाहिजे असेल, तर तुम्हाला फक्त ऑनलाईन स्वरूपात फॉर्म भरायचा आहे, दुसरं काहीच करण्याची गरज नाही. मागेल त्याला सौर कृषी पंप योजना महाराष्ट्र साठी जर तुम्हाला ध्दत्वहा ही अर्ज भरू शकता. अशी माहिती वीज विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांनी दिली

या प्रसंगी येथील प्रगतिशील शेतकरी पुरूषोत्तम हागवणे, रुपेश काळबांडे, यादवराव बागडते यांनी सौर उर्जा पंप लावण्याची इच्छा जाहिर केली.

तसेच ग्रामीण भागातील बिहालगोंदी चे शेतकरी रामदास मरकाम, वसंत नगर चे गोपाल राठोड,रतन चव्हाण, जगदिश चव्हाण, बाबा राव रेवतकर,यांनी याबाबत शंका उपस्थित केल्या. त्या शंकांचे समाधान वरिष्ठ अधिकारी. यांनी केले.

या प्रसंगी या भागातील राजेंद्र जाधव, सतीश चव्हाण, प्रमोद वा चापले, रविकांत शिर्के, बाबा शेख,विक्रांत जनई, सुरेंद्र भाजिखाये,स्वप्निल व्यास, पदम डेहनकर, नरेश नागपुरे, प्रकाश बारंगे,बाळासाहेब ढोके,जमीर शेख ,दुष्यांत बालपांडे, इक्बाल शेख, योगराज सिंह ठाकूर,आयुष्य मान पांडे, बंडू जुनघरे, तसेच वीज वितरण विभागाचे प्रणव कुर्रेवार, उपकार्यकारी अभियंता, कोंढाळी उपविभाग,अमरपाल मून, सहाय्यक अभियंता, कोंढाळी शहर वि. केंद्र, श्रीकांत समक्रवार, सहाय्यक अभियंता, कोंढाळी ग्रामीण १ वि. केंद्र. ,प्रल्हाद ओमकार, सहाय्यक अभियंता, कोंढाळी २ वि. केंद्र. दिपक घोडके, सहाय्यक अभियंता, बाजारगाव वि. केंद्र, आशिष कुलसंगे, सहाय्यक अभियंता, रिधोरा वि. केंद्र. दुष्यंत बालपांडे, कोंढाळी . शेख जमीर, कोंढाळी. सह अनेक शेतकरी उपस्थित होते.

तुरीच्या दरात घसरण : शेतकरी चिंतेत

देवळी ■ सौ.आरती गोसटकर/कारंजेकर



देवळी : या वर्षी तुरीला चांगल्यापैकी भाव मिळेल अशी आशा असतानाच तुरीचे दर हमीभावापेक्षा कमी झाले आहेत. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य दर मिळत नसल्याने त्यांच्या अडचणीत वाढ होत आहे. तुरीच्या दरात घसरण झाल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. खरिपातील नगदी पीक अशी ओळख असलेल्या तुरीचे दर घसरले आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. तुरीचे पडते दर बघता शेतकऱ्यांना किमान हमीदर तरी मिळावा, अशी मागणी होत आहे.अवकाळी पावसामुळे तुरीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. हे पीक वाचविण्या साठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात खर्चही करावा लागला. तुरीचे क्षेत्र कमी झाल्याने तुरीचे दर वाढतील, असा विश्वास शेतकऱ्यांना होता परंतु प्रत्यक्षात तुरीच्या दरात मोठी घसरण झाली. तूर पिकाला चांगला दर मिळेल, अशी आशा शेतकऱ्यांना असतानाच तुरीचे जेमतेम आगमन होते न होते तोच तुरीचे दर कोसळले आहेत. सोयाबीन पिकाने शेतकऱ्यांच्या हातावर तुरी दिल्याने उत्पादन खर्चही वसूल झाला नाही, त्यामुळे शेतकऱ्यांची सारी भिस्त ही तूर या नगदी पिकावर होती; परंतु तिलाही हमीभवापेक्षा कमी भाव मिळाल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. या वर्षी देवळी तालुक्यातील अनेक भागात तुरीचे उत्पादन समाधानकारक झालेले असल्याने तुरीचे भाव तेजीत मिळेल अशी शेतकऱ्याना आशा होती.

नवीन तुरीला किमान ६ हजार ८०० ते ७ हजार रुपये दर मिळत आहे. केंद्राने तुरीला ७ हजार ५५० रुपये एवढा हमीभाव जाहीर केला असताना या दरापेक्षा कमी दर बाजारात मिळत आहे. आता नवीन तूर बाजारात दाखल होत असताना हमीभावापेक्षा कमी दराने तुरीची खरेदी होत असल्याने तूर पीक शेतकऱ्यांच्या हातावर तुरी देणार का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. शेतकऱ्यांनी तुरीला किमान हमीभाव तरी मिळावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे.

चुकीच्या खाण्याच्या सवयीच नाही तर या कारणांमुळेदेखील होते ॲसिडिटी

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : ॲसिडिटी म्हणजेच अपचन ही एक सामान्य समस्या आहे, ही समस्या मुख्यतः चुकीच्या पद्धतीने पदार्थ खाण्याच्या सवयीमुळे उद्भवते. मात्र, त्यासाठी इतर अनेक गोष्टीदेखील कारणीभूत ठरू शकतात.

आपल्यापैकी प्रत्येकांना कधी न कधी ॲसिडिटीची समस्या झालीच असेल. ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये अपचन, छातीत जळजळ, पोटदुखी, पोटात गॅस होणे, डोकेदुखी यांसारख्या समस्या उद्भवतात. हा पोटाचा विकार असून, पोटात जास्त प्रमाणात ॲसिड तयार झाल्यामुळे ही समस्या उद्भवते. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत कोणत्याही वयोगटातील लोकांना ॲसिडिटा होऊ शकते. खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी आणि चुकीचा आहार ही ॲसिडिटीची प्रमुख कारणे असल्याचे डॉक्टर आणि पोषणतज्ञ सांगतात. पण या व्यतिरिक्त इतरही काही गोष्टी जबाबदार असतात ज्यामुळे ॲसिडिटी होते. चला तर मग जाणून घेऊया ?सिडिटी होण्याचे इतर कारणे आणि जोखीम घटकांबद्दल सविस्तर

ॲसिडिटीची लक्षणे ओळखा

जेव्हा पोटात असलेले ?सिड जास्त प्रमाणात तयार होऊ लागते तेव्हा ॲसिडिटी होते. हे ॲसिड अन्न पचवण्यास मदत करते, परंतु जेव्हा ?सिड जास्त प्रमाणात तयार होते किंवा पोटामध्ये चुकीच्या पद्धतीने पसरू लागते तेव्हा पोटात जळजळ, वेदना आणि इतर समस्या निर्माण होतात. यादरम्यान आंबट ढेकर येणे, खाल्ल्यानंतर किंवा रिकाम्या पोटी जळजळ होणे, तोंड आंबट होणे, पोट दुखी तसेच ते जड झाल्यासारखे वाटणे, घशात जळजळ होणे, कोरडा खोकला, मळमळ किंवा उलट्या होणे ही सर्व ॲसिडिटीची लक्षणे आहेत.

ॲसिडिटी होण्याचे प्रमुख कारणे

ॲसिडिटीसाठी अनेक घटक कारणीभूत असू शकतात, त्यापैकी अन्नाशी संबंधित सवयी सर्वात प्रमुख कारण आहे. जास्त मसालेदार आणि तळलेले अन्न खाणे, चहा, कॉफी किंवा कार्बोनेटेड पेये यांचे अतिसेवन ही ॲसिडिटीची प्रमुख कारणे आहेत. जेवल्यानंतर लगेच झोपायला जाणे, किंवा जेवणाची निश्चित वेळ नसणे, उपवास करणे, अतिचरबीयुक्त पदार्थांचे सेवन करणे, जंक फूड खाणे या गोष्टींमुळे देखील ॲसिडिटी होऊ शकते.

खाण्याच्या विकारांव्यतिरिक्त, जीवनशैलीशी संबंधित अनेक घटकांमुळे देखील ॲसिडिटाहोऊ शकते. अभ्यास दर्शविते की जे लोक धूम्रपान करतात आणि मद्यपान करतात त्यांना ॲसिडिटी होण्याचा धोका अधिक असतो. या व्यतिरिक्त, जर तुम्ही जास्त तणाव आणि चिंताग्रस्त असाल तर त्यामुळे देखील तुम्हाला पोटाचे विकार होऊ शकतात.

- डॉ योगेश आहेर, खराडी, पुणे.

तुम्ही जेव्हा जास्त तणावाखाली आणि चिंताग्रस्त असाल, तेव्हा पुरेशी झोप घेतली जात नाही, तसेच या स्थितीत अनेकदा भूक देखील लागत नाही. दरम्यान बराच वेळ रिकाम्या पोटी राहिल्यास आणि मुबलक झोप न घेतल्यास ?सिडिटीचा त्रास होऊ शकतो.

- डॉ. ज्योती जाधव, वाघोली, पुणे.

काही औषधांमुळे देखील अपचनाची समस्या उद्भवू शकते. जी लोकं वेदनाशामक औषधे दीर्घकाळ घेतात किंवा स्टिरॉइड्स किंवा प्रतिजैविकांचे जास्त सेवन करतात त्यांनाही पोटाचा त्रास किंवा ॲसिडिटीचा त्रास होतो. अशा परिस्थितीत, डॉक्टरांचा सल्ला घेणे आणि औषधे बदलणे आवश्यक आहे.

- डॉ. प्रतिभा वेताळ, चंदननगर, पुणे.

पैश्याने सुख विकत घेता येते तर नामस्मरण व भक्तीने देव.: ह.भ.प भास्करगिरीजी महाराज

गोहत्या करणाऱ्याला कायमस्वरूपी जन्मठेपेची शिक्षेची तरतूद करा, धर्मसंसदेत एकमताने ठराव मंजूर

गंगापूर ■ सुनिल झिंजुर्डे पाटील



गंगापूरः तालुक्यातील कायगाव टोका येथील रामेश्वर मंदिर येथे गौदावारी गंगा प्रगटदिन व सद्गुरू तुकाराम महाराज अनुग्रह कार्यक्रमानिमित्त देवगड संस्थानाचे गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांचे हरिकीर्तन आयोजित करण्यात आले होते यावेळी बोलताना ह.भ.प भास्करगिरी महाराज भाविकांना उपदेश देताना सांगितले की गंगा स्नान केल्याने मनुष्य जीवनातील सर्व पापांचे क्षालन होते कारण पैश्याने सुख विकत घेता तर नामस्मरण व भक्तीने देव. प्रसन्न होतात त्यामुळे भगवंतांचे नामसमरण वं भक्ती

गोहत्या करणाऱ्याला कायमस्वरूपी जन्मठेपेची शिक्षेची तरतूद करा, धर्मसंसदेत एकमताने ठराव मंजूर... ह.भ.प. डॉ. जनार्दन मेटे महाराज देवगड संस्थनचे सदुरू महंत हभप भास्कररगिरी महाराज यांच्या उपस्थितीत कायगाव येथे सर्व साधूसंतांची धर्मसंसद आयोजित करण्यात आली होती या धर्म्सासदेत गोमालेला राज्यसरकारने राज्यमातेचा दर्जा दिल्याने सरकारचे अभिनंदन करण्यात आले मात्र ज्याप्रमाणे स्वरूप राष्ट्रीय प्राणी, पक्षी यांची हत्या केल्यावर जि शिक्षा आरोपीला केली जाते त्यापेक्षा मोठी अथवा जन्मठेपेची शिक्षा गोहत्या करणाऱ्याला देण्याचा कायदा सरकारने आणावा असा एकमुखी ठराव कायगाव येथील धर्मसंसदेत परित करण्यात आला असून संतांचा हा आवाज वं ठराव प्रसार माध्यमानी उचलून धरावा वं सरकारला जन्मठेपेचा कायदा पास करण्यास भागा पडावे असे आवाहन हभप डॉ. जनार्धन मेटे महाराज यांनी केले आहे.

अनधिकृत सेंट चावरा स्कूलवर कारवाईची मागणी - शासन निर्णयाची पायमल्ली, पालकांची फसवणूक

रांजणगाव गणपती ■ बाळासाहेब कुंभार



रांजणगाव गणपतीः सरदवाडी ता. शिरूरशासनाची कोणतीही मान्यता नसताना गेली ७-८ वर्षे सेंट चावरा स्कूल, सरदवाडी येथे बेकायदेशीरपणे इंग्रजी माध्यमाची शाळा चालवली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शासन निर्णयानुसार, शाळांना परवानगी मिळालेल्या माध्यमात बदल करता येत नाही. मात्र, या संस्थेने मराठी माध्यमाची परवानगी घेऊन इंग्रजी माध्यमातील वर्ग सुरू केले आहेत.

या प्रकारामुळे शासन निर्णयाची पायमल्ली झाली असून, पालकांची आणि विद्यार्थ्यांची फसवणूक झाल्याचे सांगण्यात येत आहे. विशेष म्हणजे, शाळेला ळ-अर्ध्ए क्रमांक नाही, अंतिम मान्यता नाही, तसेच शालेय संहिता नियमावली १९८१ चा भंग करण्यात आला आहे. त्यामुळे सदर संस्थेवर शासनाने दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

मराठी भाषेचा अपमान, तीव्र आंदोलनाचा इशारा

मराठी राज्यात मराठी भाषेला दुय्यम स्थान देण्याचा हा प्रकार असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. मराठी माध्यमाची परवानगी असतानाही इंग्रजी माध्यम चालवणे हा मराठी भाषेचा अपमान असल्याचे सांगण्यात आले आहे. याप्रकरणी तातडीने कारवाई न केल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष महिबुब सय्यद, शिरूर प्रवासी संघाचे अध्यक्ष अनिल बांडे, मनसेचे तालुका संघटक अविनाश घोगरे, मनसेचे शहराध्यक्ष आदित्य मैड, मनसेचे शिरूर सचिव रवि लेंडे यांनी दिला आहे.

ठळक मुद्देः

अनधिकृतपणे सुरू असलेली इंग्रजी माध्यमाची शाळा शासन निर्णयाचा भंग, परवानगी नसताना शाळा चालू

ळ-अर्ध्ए क्रमांकआणिअंतिम मान्यता नाही मराठी भाषेचा अपमान केल्याचा आरोप तातडीने कारवाई न केल्यास आंदोलनाचा इशारा मनसने दिला आहे.

मतांच्या जुमल्याची गरज संपताच लाडक्या बहिणी ठरल्या गुन्हेगार

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : बनावट कागदपत्रांच्या आधारे लाडकी बहीण योजनेचा. लाभ घेतलेल्या महिलांच्या विरोधात सरकारने गुन्हे दाखल करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे खोटी कागदपत्रे दाखल केलेल्या बहिणींमध्ये कमालीची घबराट निर्माण झाली आहे. विधानसभा निवडणुकीवर डोळा ठेवून महायुती सरकारने? ऐन निवडणूकीच्या तोंडावर विविध घोषणांचा पाऊस पाडला. याच नानाविध योजनांमुळे तिजोरीवर मोठा आर्थिक ताण पडला गेला असला तरी त्यामुळेच सरकार बहुमताने सत्तेवर बसले. अन्यथा विद्यमान सरकारला सत्तेपासून दूर रहावे लागले असते.

विविध प्रकारच्या योजना जाहीर करुन कोणत्याही प्रकारे ही निवडणूक जिंकता यावी, हाच हेतू डोळ्यासमोर ठेवून शासनाने भोळ्या भाबड्या महिलांना 'लाडकी बहीण' ही उपाधी बहाल करीत मोठ्या रकमांची प्रलोभनं दिली. शासनाचा हा मतलबी डाव भोळ्या महिलांनी लक्षात न घेता शब्दाला जागत भरभरुन मतं दिली, ज्यामुळे या सरकारला सत्तेची फळं चाखणं शक्य झालं. परंतु सत्तेसाठी अपेक्षित मतांचा जुमला यशस्वी ठरताच त्याच लाडक्या बहिणींना हे भाऊ आता गुन्हेगाराच्या कटघरात उभे करायला मोठ्या जोमाने सरसावले आहेत.

कोणतीही योजना जाहीर करतांना किंवा त्याबाबतीत शासनाच्या तिजोरीतील रकमा देण्याच्या अगोदर संबंधित खऱ्या कागदपत्रांची पूर्तता ज्या महिला करु शकतील का नाही, याची शासनस्तरावर? खातरजमा करुन घेणे आवश्यक होते. त्यासाठी तशी यंत्रणा तैनात करणे आवश्यक होते. तसे झाले असते तर आज जी फसवणूक केली म्हणून संबंधित महिलांना दूषणं दिली जात आहेत, ते घडलेच नसते. मतलबासाठी घाईघाईने घेतलेला निर्णय शासनाच्या पूर्णपणे अंगलट आला असल्याने आता महिलांना चुकीच्या कटघऱ्यात उभे करणे उचित ठरणारे नाही. स्वार्थीपणानं उचललेलं पाऊल स्वतःच्या पथ्यावर पाडून घेतांना अपेक्षेपेक्षाही अधिक मतांनी व न भूतो न भविष्यति अशा जागा निवडून देणाऱ्या लाडक्या बहिणींना शासनाने किमानपक्षी दोषी न ठरवता त्यांचे आभारच मानले पाहिजे. अब्जो, खरबोच्या रकमा गिळंकृत करुन जे जे उद्योजक परदेशात पळून गेले, त्यांचं काय केलं, ते जवळचे, आप्तेष्ट म्हणून त्यांना एवढ्या मोठमोठ्या रकमा माफ करणे शासनाला खिजगणती वाटत असेल तर मग ज्या बहिणींनी तुम्हाला सत्तेवर बसवले, त्यांचे ऋण व्यक्त करुन शासनाने तो दोष आपलाही तेवढाच आहे, हे समजून सत्तेच्या हव्यासाने प्रलोभनं देणाऱ्या भाजपासह महायुतीच्या सर्व घटक पक्षांनी मिळून ती रक्कम भरली तर या बहिणींच्या ऋणातून मुक्ती मिळू शकेल, तर आणि तरच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना हे नाव सार्थकी ठरले जाईल. अन्यथा कटघऱ्यात उभे करु पहाणाऱ्या त्याच लाडक्या बहिणींना गुन्हेगार ठरविणार असाल तर निश्चितच त्यांचा शाप लागला जाईल. एवढेच नाही तर भविष्यात शासनाला लवकरच त्याची किंमतही मोजावी लागेल, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

ज्येष्ठांनो सावधान ! बंटी-बबलीनं ५०० लोकांना घातला कोट्यवधी रुपयांचा गंडा पोलिसांनी न्यायालयात ६०० पानांचं आरोपपत्र केलं दाखल

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : उत्तर प्रदेशच्या कानपूरमध्ये ६५ वर्षावरील नागरिकांना २५ वर्षाच्या तरुणासारखं बनवण्याचं स्वप्न दाखवून कथित बंटी-बबली नावाच्या जोडप्याने घोर फसवणूक केली आहे. जवळपास ५०० ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करून या बंटी-बबलीने तब्बल ३५ कोटी रुपये हडप केले. पोलिसांनी या प्रकरणी ६०० पानांची चार्जशीट कोर्टात दाखल केली आहे. यात लिप्त आरोपी राजीव दुबे आणि रश्मी दुबे या कथित बंटी-बबलीच्या मुसक्या आवळून कोर्टात हजर केले. पोलिसांकडून सदर आरोपींच्या विरोधात ६०० पानाचं आरोपपत्र दाखल करण्यात आलं आहे. यात १४ साक्षीदार बनवण्यात आले आहेत.

पोलीस निरिक्षक धर्मेंद्र कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑक्सिजन थेरेपी मशीनची तपासणी झाल्याशिवाय मेडिकल रिपोर्ट येऊ शकत नाही. स्वरूप नगरच्या रेनू सिंह चंदेल यांनी २० सप्टेंबर २०२४ रोजी या प्रकरणी तक्रार नोंदवली. त्यात या बंटी-बबलीने अनेक लोकांची घोर फसवणूक करून कोट्यवधी रूपये हडप केल्याचा आरोप केला आहे. पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी केली असता त्यात हे आरोपी जोडपे दोषी आढळले. त्यानंतर त्यांच्याविरोधात कोर्टात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

काय आहे प्रकरण?

जीम संचालक राजीव दुबे आणि त्यांची पत्नी रश्मी दुबे हे लक्झरी लाईफ जगतात. त्यांच्यामुळे चांगल्या उच्चभ्रू सोसायटीतील अनेक जण यांच्या जाळयात गुरफटले गेले. राजीव आणि रश्मी यांनी साकेत नगर भागात 'रिवाईवल वर्ल्ड' नावाची एक सेवाभावी संस्था स्थापन केली होती. हे पती-पत्नी जोडपे दिसायला खूप सुंदर होते. सर्वांशी मिळून मिसळून व हसत खेळत वागण्याची आणि लोकांवर छाप पाडण्याची त्यांच्यात आधुनिक अशी कला होती. ज्यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक या जोडप्याच्या फसवणुकीला सहजपणे बळी पडले. या जोडप्याने ज्येष्ठांना सांगितले की, आमच्या जीमच्या इमारतीत आम्ही ऑक्सिजन थेरेपीची मशीन लावली आहे. ही मशीन इस्त्रायलहून मागवली आहे. त्या मशीनच्या आधारे आम्ही वृद्धांना घोड्यासारखे म्हणजेच एकदम तरुणांसारखेच बनवतो, असं सांगून त्या सर्वांचा ते विश्वास संपादन करीत होते. कालांतराने या प्रकरणी नागरिकांना संशयाची घरघर सुरु झाली. संशयाचे ते भूत एवढे विकोपाला गेले की, ज्यामुळे यात गुरफटलेल्या सर्व संतप्त ज्येष्ठांनी संपूर्ण वातावरण कमालीचे तप्त करुन टाकले होते. ज्यामुळे संपूर्ण कानपूर शहर व परिसरात शेवटी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता.

दरम्यान, हे प्रकरण पोलीस ठाण्यात पोहचताच तत्कालीन डीसीपी यांनी याप्रकरणी एसआयटीची स्थापना केली. पोलिसांनी त्यांच्या आरोप पत्रात ऑडिओ, व्हिडिओ, फॉरेन्सिक रिपोर्टसह बँक खात्याचे डिटेल्सही पुरावे म्हणून दिले आहेत. विशेष म्हणजे या स्कीमचा प्रचार करण्यासाठी नेटवर्क मार्केटिंगचा वापर करण्यात आला होता. त्यात अनेक स्कीम लॉन्च केल्या होत्या. टार्गेट पूर्ण करण्यासाठी लोकांना हजार रुपयांपासून लाखो रुपये गिफ्ट देण्यात आले. ६ लाखावर सुटकेस, १२ लाखावर एलईडी टीव्ही, २४ लाखावर लॅपटॉप, ४८ लाखावर आंतरराष्ट्रीय ट्रीप, १.४ कोटीवर छोटी कार अशाप्रकारे अनेक गिफ्ट लोकांना मार्केटिंगसाठी देण्यात येत होते.

संत तुकाराम विद्यालय शिंगी येथे दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ मोठ्या उत्साहात साजरा

गंगापूर ■ सुनिल झिंजुर्डे पाटील



गंगापूर : गंगापूर तालुक्यातील शिंगी येथील संत तुकाराम विद्यालयात इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना मोठ्या उत्साहात निरोप देण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद सोनवणे तर प्रमुख पाहुणे म्हणून शालेय समितीचे अध्यक्ष माडिगंबर पाटील वाखूरे व गंगापूर सहकारी साखर कारखाना संचालक मा बाबूलाल शेख यांची उपस्थिती होती. यावेळी स्व गेणुजी राणुजी बनकर यांच्या स्मरणार्थ शारिरीक शिक्षण विभागातफै घेण्यात आलेल्या स्पर्धेतील प्रथम - आयान कलीम पठाण व आयेशा अशिर शेख, द्वितीय - हुजेफ हरून पठाण व वैष्णवी गोकुळ दहातोंडे या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन इयत्ता नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांनी व वर्ग शिक्षकांनी करून दहावीच्या आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा देत भेटवस्तू देऊन स्वादिष्ट भोजनाचे नियोजन केले. कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांनी व विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेतील आठवणी सांगितल्या तसेच प्रमुख वक्ते तसेच अध्यक्ष व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधी मार्गदर्शन करून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साक्षी बोक्से हिने केले तर साक्षी बाराहाते हिन आभार मानले. यावेळी मुख्याध्यापक प्रमोद सोनवणे, श्रीमती मंगल जाधव, संदिप सावंत, कैलास बनकर, गोकुळ काकडे, गजानन हरकळ, हरिभाऊ चौधरी यांची उपस्थिती व सहकार्य लाभले.

बारावीची ११ फेब्रुवारीला तर दहावीची २१ फेब्रुवारीपासून परीक्षा! विद्यार्थ्यांनी ताण घेऊ नये, अभ्यासाचे करावे अचूक वेळापत्रक

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : इयत्ता बारावीची परीक्षा पुढील आठवड्यात ११ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाला शाळा-महाविद्यालय स्तरावर प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेत २० गुण आहेत. त्यामुळे टक्केवारी जास्त मिळावी, यासाठी प्रत्येकाने परीक्षा काळातील अभ्यासाचे अचूक नियोजन करणे गरजेचे आहे. त्यासाठी वेळापत्रक बनवून त्यानुसार अभ्यास करावा, जेणेकरून चांगल्या गुणांनी तो विद्यार्थी उत्तीर्ण होऊ शकेल, असा विश्वास शिक्षणतज्ज्ञांना आहे.

परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे असतील, बाहेरील पर्यवेक्षक व केंद्र संचालक असतील, बैठे पथक व भरारी पथकांचेही परीक्षेवर लक्ष असणार, ड्रोन कॅमेरे, परीक्षा हॉलमध्ये जाताना अंगझडती होईल, अशा बाबींची भीती कोणीही बाळगू नये. प्रत्येक परीक्षेवेळी अशा गोष्टी होत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्यासंदर्भात कोणताही ताण न घेता चांगला अभ्यास करावा. शांत, निवांत ठिकाणी जाऊन अभ्यास करावा, मोठ्याने वाचून अभ्यास केल्यास जास्त लक्षात राहातो.

आपल्याला लक्षात ठेवायला किंवा पाठांतर करायला कठीण जाणाऱ्या प्रश्नांच्या उत्तरांचे वाचन करुन त्यावर स्वतः नोट्?स (महत्त्वाचे पॉईंट) काढा आणि त्याचे वाचन केल्यास तो प्रश्न कठीण वाटणार नाही. गणितांचा सराव करावा, विज्ञानातील प्रयोग लक्षात ठेवावेत. इंग्रजीची उत्तरे लिहिताना स्पेलिंग चुकणार नाही, याची दक्षता घ्यावी. पास होणे फार कठीण नक्कीच नाही, आता फक्त चांगली टक्केवारी मिळावी यासाठी अभ्यासाचे वेळापत्रक चोख असणे आवश्यक आहे, असा सल्ला शिक्षणतज्ज्ञांनी दिला आहे.

वेळापत्रक तयार करून परीक्षेला सामोरे जावे

विद्यार्थ्यांनी कोणताही ताण न घेता अत्यंत प्रसन्न भावनेने परीक्षा द्यावी. जीवनातील ही शेवटची परीक्षा नसून विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरावर पोचण्यासाठी अशा अनेक परीक्षा द्यायच्या आहेत. त्यामुळे कोणीही ताण न बाळगता अभ्यासाचे अचूक नियोजन, वेळापत्रक तयार करून परीक्षेला सामोरे जावे.

- स्वाती सात्रस , शिक्षिका , न्यू इंग्लिश स्कूल उरळगाव.

अभ्यासाचे असे हवे वेळापत्रक...

- पहाटे साडेपाच ते सकाळी नऊ
- सायंकाळी साडेपाच ते साडेसात
- दररोज झोप किमान सात तास हवी
- रात्री दहा-साडेदहानंतर जागरण शक्यतो नकोच

रमाई जन्मोत्सव, ब्रह्मदेशातील भिक्कुची धम्मदेशना

परभणी ■ अरविंद कांबळे



परभणीः पूर्णा डॉ, बी आर आंबेडकर स्मारक व बुद्ध विहार समिती व धम्म सेवेत कार्यरत असलेल्या महिला मंडळाच्या वतीने दिनांक सात फेब्रुवारी २०२५ रोजी बुद्ध विहार पूर्णा या ठिकाणी सकाळी दहा वाजता अखिल भारतीय भिकू संघाचे कार्याध्यक्ष भदंत डॉ, उपगुप्त महाथेरो त्यांच्या मार्गदर्शनाखाली भदंत पयावंश यांच्या संयोजनाखाली रमाई जन्मोत्सव व एकदिवसीय विपश्यना शिबिर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख धम्मदेशना भदंत अशिन उत्तम तारा सयाडो संस्थापक अध्यक्ष थब रवा मेडिटेशन सेंटर म्यानमार यांची संपन्न झाली.

जयंती उत्सवाच्या अध्यक्ष म्हणून निरंजना धम्म सेवाभावी महिला मंडळाच्या अध्यक्षा कासाबाई कांबळे ह्या होत्या.

प्रमुख वक्त्या म्हणून सुप्रसिद्ध लेखिका डॉ, करुणा जमधाडे व प्रमुख अतिथी म्हणून सारनाथ वेल्फेअर फाउंडेशन परभणी चे संचालक भीमराव वायवळ हे होते. अखिल भारतीय भिकू संघाचे कार्याध्यक्ष यांनी प्रमुख पाहुणे प्रमुख वक्ते व विदेशातील भंतेगणांचा व पाहुण्यांचा परिचय करून दिला.

रमाईचा महान आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपण मार्गक्रमण केलं पाहिजे असे याप्रसंगी सांगितले. यावेळी त्यांच्या रमाई कादंबरीच्या चौथ्या आवृत्तीचा प्रकाशन झाल.

प्रमुख धम्मदेशनेमध्ये डॉ,अश्विन उत्तम तारा सयाडो यांनी विपश्यनेचे महत्त्व विशद करत असताना बौद्धकालीन मानवी मनाची मशागत करणारी ही कला आहे.

बुद्धांनी सांगितलेली प्रज्ञाशील करुणा मंगल मैत्री आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाली पाहिजे अशा प्रकारचे विवेचन त्यांनी याप्रसंगी केले. व उपस्थित कडून अर्धा ते पाऊण तास विपश्यना करून घेतली. हा कार्यक्रम संपल्यानंतर उपस्थिताना विहार समितीच्या वतीने भोजन दान देण्यात आले.

यावेळी प्रमुख उप स्तीती मध्ये ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत प्रकाश कांबळे नगरपालिकेचे गटनेते उत्तम भैया खंदारे नगरसेवक हर्षवर्धन गायकवाड माजी उपनगराध्यक्ष यादवराव भवरे उद्दोजक गौता भोळे ज्येष्ठ धम्म उपासक अमृत मोरे टी झेड कांबळे कॉम्रेड अशोक व्ही कांबळे, वारा काळे इंजिनीयर पी. जी रणवीर दिलीप गायकवाड, पत्रकार विजयराव बगाटे, अरविंद कांबळे, शिवाजी थोरात, हनवते गुरुजी भारतीय बौद्ध महासभेचे माजी जिल्हाध्यक्ष शामराव जोगदंड शाहीर गौतम कांबळे, मुगाजी खंदारे ,ज्ञानोबा जोंधळे, गंगाधर काबळे बरबडीकर. गौतम वाघमारे ,आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरज जोंधळे राहुल धबाले, बाळू कांबळे बरबडीकर, राहुल दवणे बोद्धाचार्य त्र्यंबक कांबळे बौद्धाचार्यअमृतकरहाळे अतुल गवळी, सोनू काळे सह धम्म सेवेत कार्यरत असलेल्या महिला मंडळांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रीकांत हिवाळे यांनी केले.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242